मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : १४७ ■ बुधवार, ०४ फेब्रुवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# केंद्रीय अर्थसंकल्प विकसित भारताच्या दिशेने दमदार पाऊल – आ. निरंजन डावखरे

## अर्थसंकल्प देशाच्या विकासाचे ग्रोथ इंजिन - आमदार महेश बालदी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** केंद्रीय अर्थसंकल्प २०२६-२७ हा भारताच्या वेगवान विकासाला नवी दिशा देणारा आणि सर्वसमावेशक प्रगतीचा स्पष्ट आराखडा मांडणारा अर्थसंकल्प आहे. आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या सक्षम नेतृत्वाखाली आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या दूरदृष्टीतून सादर झालेला हा अर्थसंकल्प देशाच्या आर्थिक परिवर्तनाचा मजबूत पाया ठरणार असून हा अर्थसंकल्प विकसित भारताकडे दमदार वाटचाल करणारा आहे असे प्रतिपादन अर्थसंकल्प कोकण संयोजक तथा आमदार निरंजन डावखरे यांनी आज (दि. ०३) पनवेल येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत केले.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी १ फेब्रुवारी रोजी मोदी सरकारचा अर्थसंकल्प सादर केला. ना. सीतारामन यांचा यंदाचा सलग नववा केंद्रीय अर्थसंकल्प आहे. अर्थसंकल्पासह त्यांनी विक्रम प्रस्थापित केला आहे. देशाचा अर्थसंकल्प सलग नवव्यांदा सादर करण्याचा विक्रम करणाऱ्या त्या जगातील पहिल्या महिला अर्थमंत्री ठरल्या आहेत, असेही यावेळी नमूद करून पत्रकार परिषदेच्या माध्यमातून त्यांचे अभिनंदन केले. उरण विधानसभा मतदार संघाचे आमदार महेश बालदी आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील मार्केट यार्ड येथे झालेल्या या पत्रकार परिषदेला भाजपचे सरचिटणीस व पनवेल महानगपालिकेतील महायुतीचे गटनेते नितीन पाटील, अर्थसंकल्प उत्तर रायगड संयोजक व भाजपचे जिल्हा सरचिटणीस नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, भाजपनेते अनिल कौशिक, ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, पनवेल पश्चिम मंडल अध्यक्ष रुपेश धुमाळ, ओवळे ग्रामपंचायत सरपंच राकेश गायकवाड, कामगार नेते रविंद्र नाईक, युवा मोर्चाचे कामोठे अध्यक्ष तेजस जाधव आदी उपस्थित होते.

आमदार निरंजन डावखरे यांनी पत्रकारांना पुढे माहिती देताना सांगितले कि, या अर्थसंकल्पात एफडीआयच्या माध्यमातून सेमीकंडक्टर, फार्मा, इलेक्ट्रॉनिक्स यांसारख्या उच्च तंत्रज्ञान उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आकर्षित करण्यावर भर देण्यात आला आहे. यामुळे देशभरात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होणार असून युवकांसाठी नव्या संधींचे दरवाजे खुले होणार आहेत. केवळ टेक्नॉलॉजी ड्रिव्हन विकास नव्हे, तर हँडलूम क्षेत्रातील कारागीर, पारंपरिक उद्योग आणि स्थानिक उद्योजक यांनाही मुख्य प्रवाहात आणण्याचा समावेशक दृष्टिकोन या बजेटमध्ये स्पष्टपणे दिसून येतो.




महाराष्ट्र आणि कोकण विभागासाठी करण्यात आलेल्या घोषणा विशेष महत्त्वाच्या आहेत. कोकणातील नारळ व काजू उत्पादक शेतकऱ्यांसाठी प्रक्रिया उद्योग, मार्केटिंग आणि उत्पादनवाढीवर आधारित प्रोत्साहन योजना ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळ देणारी ठरेल. भिवंडी, इचलकरंजी, पुणे आणि नाशिकसारख्या पारंपरिक औद्योगिक क्लस्टर्सच्या पुनरुज्जीवनासाठी विशेष निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय रोजगारनिर्मिती आणि निर्यात वाढीसाठी निर्णायक ठरेल. मुंबई–पुणे आणि पुणे–हैदराबाद हाय-स्पीड रेल कॉरिडोरमुळे महाराष्ट्राच्या औद्योगिक आणि आर्थिक गतीला मोठी चालना मिळणार आहे. त्याचबरोबर मुंबई येथे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी (IICT) चे मुख्य केंद्र स्थापन केल्यामुळे ॲनिमेशन, गेमिंग, कॉमिक्स आणि AVGC क्षेत्रात मुंबईला जागतिक ओळख मिळणार आहे. 'ऑरेंज इकॉनॉमी' अंतर्गत १५,००० शाळा आणि ५०० महाविद्यालयांमध्ये कंटेंट क्रिएटर लॅब्स सुरू होणार आहे यामुळे MMR विभागाला आणि महाराष्ट्र राज्याला देखील यामधून फायदा मिळणार आहे. याद्वारे मुंबईला या नव्या डिजिटल अर्थव्यवस्थेची राजधानी बनवण्याचा दूरदृष्टीपूर्ण निर्णय यामुळे अत्यंत स्वागतार्ह आहे. या ऐतिहासिक अर्थसंकल्पासाठी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे मनापासून अभिनंदन करतो तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाखाली भारत आत्मनिर्भर, समृद्ध आणि जागतिक नेतृत्वाकडे वाटचाल करेल, असा ठाम विश्वास व्यक्त करतो.

केंद्रीय करातून महाराष्ट्राला मिळणारा वाटा ९८,३०६ कोटी रुपये इतका असणार आहे. याशिवाय अर्थसंकल्पाचे प्राथमिक आकलन करता १२,३५५ कोटी विविध प्रकल्पांसाठी आहेत. त्यामुळे सुमारे १ लाख कोटी महाराष्ट्राला मिळतील, असे सांगण्यात आले. शहरीकरणाला नियोजनबध्द करुन, उद्योग आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देऊन, गुंतवणूक आणि रोजगार निर्मितीसाठी खंबीर उपाययोजना या अर्थसंकल्पातून करण्यात आल्या आहेत. पायाभूत सुविधा क्षेत्रात १२ लाख कोटींची गुंतवणूक सरकार करणार आहे, पूर्वी जी केवळ १ लाख कोटी असायची. ५ लाख लोकसंख्या असलेल्या शहरातील विकासाचा विचार करुन शहरीकरणाच्या एकात्मिक विचार करण्यात आला आहे. यातून विविध क्षेत्रांना दिशा, गती आणि निधी प्राप्त होणार आहे. याचा मोठा लाभ महाराष्ट्राला होणार आहे. तसेच शेती, पशुपालन, मत्स्यव्यवसाय आणि सिंचन यासाठी भरीव तरतुदी करण्यात आल्या आहेत, देशभरातील प्रत्येक जिल्ह्यात मुलींसाठी वसतिगृह्याची निर्मिती होणार आहे, यामुळे ग्रामीण भागातून शहरी भागात शिक्षणासाठी येणाऱ्या मुलींची राहण्याची मोठी सोय होणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. त्याचबरोबर चामड्याध्या वस्तू, सिंथेटिक पादत्राणे, यामडभाचे उत्पादने, १७ कर्करोग आणि मधुमेहावरील औषधे शुल्कमुक्त, लिथियम आयन बॅटरी, मोबाईल बैटरी, सौर ग्लास, मिश्र वायू सीएनजी, ईव्ही, मायक्रोवेव्ह ओव्हन, विमान इंधन, परदेश प्रवास स्वस्त होणार असल्याचीही माहिती या पत्रकार परिषदेच्या माध्यमातून आमदार निरंजन डावखरे यांनी दिली.

### अर्थसंकल्प देशाच्या विकासाचे ग्रोथ इंजिन

लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम नेतृत्वाखाली आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या दूरदृष्टीतून सादर झालेला हा अर्थसंकल्प विकसित भारताचा ग्रोथ इंजिन ठरणार आहे. आपल्या येथे असलेल्या अटल सेतू, विमानतळ व आगामी प्रकल्पामुळे मोठ्या प्रमाणात विकास होत आहे. विमानतळाच्या रोजगार संधीमध्ये २७ गावातील प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य देण्यात आले. या ठिकाणी जगातील सर्वोत्कृष्ट पाच विद्यापीठे येत आहेत. एज्युसिटी, स्पोर्टसिटी व मेडिसिटीच्या अनुषंगाने मोठ्या प्रमाणात विकासात्मक घडणार आहे. त्याचबरोबर मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी पेण येथे ग्रोथ सेंटर उभारणीची घोषणा केली आहे, त्यामुळे रायगड जिल्ह्याच्या विकासावर मोठ्या प्रमाणात लक्ष केंद्रित करण्यात आले असून हा अर्थसंकल्प देशाच्या विकासाचे महत्वाचे आणखी एक पाऊल ठरणार आहे.

- आमदार महेश बालदी

# शेकापचे विलास फडके यांची प्रचारात आघाडी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** आदई पंचायत समिती गणातील शेतकरी कामगार पक्ष महाविकास आघाडीचे उमेदवार विलास फडके यांनी प्रचारात आघाडी घेतल्याचे दिसून येत आहे. त्यांना मतदारांचा चांगला प्रतिसाद लाभत आहे. त्यामुळे विलास फडके यांचा विजय निश्चित मानला जात आहे.



शेतकरी कामगार पक्ष महाविकास आघाडीचे उमेदवार विलास फडके यांनी घरोघरी मतदारांशी संवाद साधण्यावर भर दिला असून गावभेटी घेतल्या जात आहेत. त्यांचे मतदार जल्लोषात स्वागत करत आहेत. विलास फडके यांचा प्रचार वेगात सुरू आहे. गावातील अनेक समस्या सोडवण्याचा प्रयत्न असेल असे यावेळी सांगण्यात आले. 7 फेब्रुवारी रोजी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पनवेल तालुक्यात शेतकरी कामगार पक्ष, महाविकास आघाडीने प्रचाराचा वेग वाढवला असून उमेदवारांना जनतेचा, नागरिकांचा, मतदारांचा चांगला प्रतिसाद लाभत आहे. विलास फडके यांना ज्येष्ठ नागरिक, महिला, पुरुष आणि युवकांनी भरभरून आशीर्वाद दिले. प्रचारादरम्यान खटारा या निवडणूक चिन्हाच्या घोषणांनी संपूर्ण परिसरात दुमदुमून गेला.

# राज्यस्तरीय 'महाराष्ट्र नृत्य रत्न नटराज पुरस्कार २०२६' सृष्टी तायडे यांना प्रदान

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे तालुका प्रतिनिधी**

**दर्यापूर :** येवदा येथील सुप्रसिद्ध व बहुगुणी नृत्यकलावंत सृष्टी सविता प्रकाश तायडे यांना नृत्यकलेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल राज्यस्तरीय 'महाराष्ट्र नृत्य रत्न नटराज पुरस्कार २०२६' प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्रातील नृत्य क्षेत्रात सातत्यपूर्ण, दर्जेदार व प्रभावी कार्य करणाऱ्या कलाकारांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार दिला जातो. शास्त्रीय तसेच लोकनृत्य प्रकारात सृष्टी तायडे यांनी केलेली अथक मेहनत, उत्कृष्ट सादरीकरण आणि कलात्मक साधना याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.

नृत्यकलेबरोबरच सृष्टी तायडे या चित्रकला, रांगोळी, मेकअप, मेहंदी, क्राफ्ट, डेकोरेशन व हेअर स्टाईल या विविध कलांमध्येही पारंगत असून त्या एक अष्टपैलू कलाकार म्हणून ओळखल्या जातात. आजवर श्रुष्टी यांना शेकडो पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

पुरस्कार स्वीकारताना सृष्टी तायडे म्हणाल्या, "हा सन्मान माझ्या नृत्यगुरू सौ. अर्चना जितेश रापर्तीवार, माझे आई-वडील, भाऊ डॉ. सुधांशु तसेच माझ्यावर प्रेम करणाऱ्या सर्व प्रेक्षकांचा आहे. पुढील काळात नृत्यकलेद्वारे व इतर कलांच्या माध्यमातून समाजासाठी अधिक योगदान देण्याचा माझा संकल्प आहे."



रामकृष्णहरी विश्वमानव मंदिर, दास टेकडी, मोझरी व पद्मश्री फाउंडेशन, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा सन्मान डॉ. संजयजी आदमने (अध्यक्ष, पद्मश्री फाउंडेशन नागपूर), प्रमोद भोंगे (ग्रामगीताचार्य, पुलगाव), शंकरराव मोहोड (ग्रामगीताचार्य, वर्धा), राष्ट्रीय कीर्तनकार अशोक भगत, ह.भ.प. विलास महाराज साबळे (अध्यक्ष, दास टेकडी), डॉ. किरणताई खडसे व गुरू अर्चनाताई रापर्तीवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमास कौंडण्यपूर येथील मठाधिपती रामानंद राजेश्वर सर्वाधिकारी प्रकाश महाराज वाघ, पद्मश्री पुरस्कारप्राप्त जनार्दनपंत बोथे (दादा), दामोदरजी पाटील, बाबारावजी पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्याध्यापक संजयजी गायकवाड यांनी पद्मश्री फाउंडेशनकडे सृष्टी तायडे यांच्या कार्याची सविस्तर माहिती मांडली.

या यशाबद्दल कला, सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांसह चाहत्यांकडून सृष्टी तायडे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, तायडे कुटुंबीयांनी सर्वांचे मनःपूर्वक आभार मानत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.

# जनतेची शक्तीच मला काम करण्याची प्रेरणा देते – आमदार विनोद अग्रवाल

## मोगर्रा येथे नवे ग्रामपंचायत भवन तसेच 1 कोटी 90 लाखांच्या विविध विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन सम्पन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी।गोंदिया। :** गोंदिया विधानसभा क्षेत्राचे जनतेचे आमदार विनोद अग्रवाल यांनी आज ग्राम मोगर्रा येथे नवीन ग्रामपंचायत भवनासह सुमारे 1 कोटी 90 लाख रुपयांच्या विविध विकासकामांची भेट गावाला दिली.

विविध लोकार्पण व भूमिपूजन कार्यक्रमात ग्रामस्थांना संबोधित करताना आमदार विनोद अग्रवाल म्हणाले, "मी आमदार नसताना देखील या गावात तुमच्या भेटीला येत होतो. त्या काळात गावाचा विकास कोसो दूर होता. ना रस्ते होते, ना कोणतेही विकासकाम.



कार्यकर्त्यांच्या मागणीवरून आम्ही मोगऱ्याच्या विकासाला सुरुवात केली. आज पाच वर्षांच्या आमच्या कार्यकाळात मोगर्रा विकासाच्या मार्गावर वेगाने पुढे जात आहे."ते पुढे म्हणाले, "जनतेने आम्हाला जनसेवक म्हणून निवड दिली. गावाची उन्नती आणि सर्वसामान्यांच्या प्रगतीसाठी काम करणे हीच माझी जबाबदारी आहे. व्यक्तिगत शासकीय योजनांचे लाभ लोकांपर्यंत पोहचवण्याबरोबरच गावात महिला बचत भवन, कृषि गोदाम, शाळा इमारत, नवे ग्रामपंचायत भवन, रस्ते, वीज, पाणी, वाचनालय, सौंदर्यीकरण तसेच इतर गावांशी जोडणाऱ्या रस्त्यांचे रुंदीकरण अशा अनेक कामे आम्ही केली आहेत."

आमदार अग्रवाल म्हणाले, "गोंदिया विधानसभा क्षेत्रात 15 वर्षांच्या प्रतिनिधित्वात 5 हजार लोकांना घरकुलाचा लाभ मिळाला, तर आमच्या 5 वर्षांच्या कार्यकाळात आम्ही 40 हजार गरजूंचे घरे मंजूर केली. 90 टक्के जनतेपर्यंत शासनाच्या रेशन योजनेचा लाभ पोहोचवला. 36 हजार निराधार व श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांना देखील योजना मिळवून देण्याचे काम केले."

या 1 कोटी 90 लाख रुपयांच्या लोकार्पण व भूमिपूजन कार्यक्रमाला आमदार विनोद अग्रवाल यांच्यासह पंचायत समिती सभापती मुनेश रहांगडाले, सोनुलाताई बरेले, सरपंच रिताबाई लिल्हारे, उपसरपंच दिलीपसिंह मुंडेले, सुजीत येवले, ओमकार नागपुरे, अनिताबाई नेवरे, मोतीराम नैकाने, अनिल कुसराम, अनिल नागपुरे, अनुसया गुरबेले, सुनिताबाई नागपुरे, तिलकचंद घोरमारे यांच्यासह ग्रामस्थ व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे नवनिर्वाचित अध्यक्ष राजेंद्र पाटील यांचा केला शिवसेनेने सत्कार



**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाचे नवनिर्वाचित अध्यक्ष राजेंद्र पाटील यांचा शिवसेना पक्षा तर्फे विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी शिवसेना पक्षाचे पनवेल महानगर प्रमुख ॲड प्रथमेश चंद्रशेखर सोमण, उपमहानगर प्रमुख महेश सावंत, सचिन मोरे, शहर प्रमुख प्रसाद सोनावणे, मंदार काणे, अभिजित साखरे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

# वाशीम मध्ये सुभेदार रामजी सपकाळ - आंबेडकर यांना केले अभिवादन

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील** : स्थानिक अजय बहुजन हिताय सार्वजनिक वाचनालय संतोषी माता नगर वाशीम येथे दि.२ फेब्रुवारी रोजी दुपारी ५:३० वाजता पितामह सुभेदार रामजी सपकाळ -आंबेडकर यांच्या ११३ व्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.यावेळी सुरूवातीला पितामह सुभेदार रामजी सपकाळ -आंबेडकर यांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. अभिवादन कार्यक्रमाला बुद्ध फुले शाहू आंबेडकर विचारांचे शाहीर धम्मानंद इंगोले,डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान, डायमंड कोचींग क्लासेस चे संचालक माधव डोंगरदिवे, वाचनालयाचे संस्थापक सचिव समाधान अवचार, समाजभूषण पुरस्कार प्राप्त प्रविण पट्टेबहादूर,से.नि.माध्य.शिक्षक आर.पी. कांबळे, अशोक देशमुख, दादाराव




इंगोले, उद्धव अवचार,अर्यन बरडे, राहूल सोमटकर,सागर अवचार,अजय अवचार यांचेसह अनेकांनी सुभेदार रामजी सपकाळ -आंबेडकर यांना अभिवादन केले.नंतर शाहीर धम्मानंद इंगोले यांनी आपल्या गाण्याच्या माध्यमातून राहील्या आठवणी, आता ते येणार ना परतूनी ,या गाण्यातून सुभेदार रामजी सपकाळ -आंबेडकर यांना अभिवादन केले.यावेळी माधव डोंगरदिवे, राजकुमार पडघान,व प्रविण पट्टेबहादूर, वाचनालयाचे संस्थापक सचिव समाधान अवचार यांनी सुभेदार रामजी सपकाळ -आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन माधव डोंगरदिवे यांनी केले तर आभार प्रदर्शन समाधान अवचार यांनी केले.

# आयुष क्षेत्राला बळ – डॉ. भागवत कालापाड (जनरल चिकित्सक, ॲक्युपंचर तज्ञ) यांची जिल्हाध्यक्षपदी दणदणीत पुनर्निवड!

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडेवाशीम जिल्हा प्रतिनिधी वाशिम** :AIMA (आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन) च्या वतीने वाशिम जिल्ह्यात संघटन बळकटीकरणासाठी करण्यात येणाऱ्या महत्त्वपूर्ण नियुक्त्यांमध्ये जिल्ह्यातील आयुष वैद्यकीय क्षेत्रातील अग्रगण्य व्यक्तिमत्त्व असलेले डॉ. भागवत नारायण कालापाड – जनरल चिकित्सक, ॲक्युपंचर तज्ञ यांची जिल्हाध्यक्षपदी दुसऱ्यांदा निवड करण्यात आली आहे.

ही नियुक्ती AIMA चे व्हॉईस चेअरमन माननीय श्री. डॉ. नितीनराजे पाटील यांच्या आदेशानुसार करण्यात आली आहे. डॉ. कालापाड यांनी आपल्या पहिल्या कार्यकाळात वाशिम जिल्ह्यातील आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी, सिद्ध



**"AIMA ने माझ्यावर पुन्हा एकदा विश्वास दाखवून ही जबाबदारी दिली, याबद्दल मी संस्थेचे तसेच राष्ट्रीय व राज्यस्तरीय नेतृत्वाचे मन:पूर्वक आभार मानतो. संघटनेच्या ध्येय–धोरणांनुसार प्रामाणिकपणे काम करत वाशिम जिल्ह्यातील आयुष क्षेत्र अधिक सक्षम व लोकाभिमुख करण्यासाठी मी सतत प्रयत्नशील राहीन."**

**— डॉ.भागवत कालापाड**
**जिल्हाध्यक्ष, AIMA वाशिम**
**जनरल चिकित्सक, ॲक्युपंचर तज्ञ**

तसेच ॲक्युपंचर क्षेत्रातील डॉक्टर, वैद्य व आरोग्यसेवकांना एकत्र आणत संघटनेला भक्कम व प्रभावी दिशा दिली.

त्यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात अनेक मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, जनजागृती कार्यक्रम, व्यसनमुक्ती मोहिमा तसेच आयुष पद्धतींच्या प्रचार-प्रसारासाठी विविध उपक्रम यशस्वीपणे राबवण्यात आले. ग्रामीण भागात आरोग्यसेवेचा विस्तार करत सामान्य नागरिकांपर्यंत उपचार पोहोचवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले.

संघटन कौशल्य, अभ्यासू वृत्ती व सेवाभावी दृष्टिकोन यामुळे डॉ. भागवत नारायण कालापाड – जनरल चिकित्सक, ॲक्युपंचर तज्ञ – हे AIMA मधील विश्वासार्ह नेतृत्व म्हणून ओळखले जातात. त्यामुळेच त्यांची पुन्हा एकदा जिल्हाध्यक्षपदी निवड झाल्याने वाशिम जिल्ह्यात AIMA च्या कार्याला अधिक गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

या पुनर्निवडीमुळे आयुष वैद्यकीय क्षेत्र अधिक संघटित, सक्षम व लोकाभिमुख करण्याच्या दिशेने नवे पर्व सुरू होईल, अशी भावना संघटनेतील पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे

# महाराष्ट्र डिजिटल दीपस्तंभ अवॉर्ड 2026 अमित रामगिरवार यांना जाहीर

**दैनिक युवक आधार**

**उमरी वार्ताहर / रूपेशकुमार ग.श्रीरामवार** : ड्रिम फ्युचर फाउंडेशन आयोजित महाराष्ट्र डिजिटल दीपस्तंभ अवॉर्ड 2026 अमित अशोकराव रामगिरवार यांना शैक्षणिक विकासासाठी समर्पित कर्तृत्ववान शिक्षकांचा गौरव साठी पुरस्कार जाहीर करण्यात आला. डिजिटल साक्षरतेतून आत्मनिर्भर तेकडे नेणारा आजच्या डिजिटल युगात संगणक ज्ञान हे लक्झरी नसून मूलभूत गरज आहे. शिक्षण म्हणजे फक्त डिग्री नव्हे, तर आयुष्य बदलण्याचं साधन आहे. या विचारातूनच नांदेड येथे केअर कॉम्पुटर इन्स्टुट च्या माध्यमातुन अमित अशोकराव रामगिरवार यांनी पायाभरणी



केली. संघर्षमय प्रारंभ पण ध्येय स्पष्ट सुरुवातीचा काळ सोपा नव्हता. ग्रामीण व सामान्य पार्श्वभूमीतील अनेक विद्यार्थी संगणकाला घाबरत होते.ऑनलाइन फॉर्म, ई-मेल, सरकारी पोर्टल्स, डिजिटल पेमेंट हे सगळं त्यांच्यासाठी अवघड होतं.पण अमित रामगिरवार सरांनी हार मानली नाही.ते म्हणत होते की भीती दूर केली की, शिकणं आपोआप सुरू होतं.


डिजिटल सक्षमीकरणाची चळवळ बनली.आज त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी नोकरीत स्थिर झाले, काहींनी स्वतःचे CSC / Online Service Centers सुरू केले,काहींनी अकाउंटिंग, Tally, GST मध्ये करिअर घडवले, सामान्य नागरिक डिजिटल सेवांमध्ये आत्मनिर्भर झाले हीच त्यांच्या कार्याची खरी ओळख असल्याचे त्यांनी वार्ताहर यांच्याशी मुलाखत देतांना सांगितले. ड्रिम फ्युचर फाउंडेशन च्या वतीने महाराष्ट्र डिजिटल दीपस्तंभ अवॉर्ड 2026 हे अमित अशोकराव रामगिरवार यांना जाहीर करण्यात आले त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# भुकेचा केंद्रबिंदू'ला आणखी एक मानाचा पुरस्कार जाहीर

## अमरावतीच्या अखिल भारतीय एल्गार गजल संमेलनात होणार गौरव

**दैनिक युवक आधार**

**एम.डी.सुरोशे महागाव (यवतमाळ) :** मराठी ग़ज़ल परंपरेत सामाजिक जाणिवांचा ठसा उमटविणारे महागाव येथील सुप्रसिद्ध ग़ज़लकार गजानन वाघमारे यांच्या 'भुकेचा केंद्रबिंदू' या ग़ज़ल संग्रहास आणखी एका प्रतिष्ठेच्या पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. या संग्रहास स्व. व्यंकटराव देशमुख स्मृती ग़ज़ल गुंफन पुरस्कार जाहीर झाला असून, ८ फेब्रुवारी २०२६ रोजी अमरावती येथे होणाऱ्या अखिल भारतीय एल्गार ग़ज़ल संमेलनात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. मंगेश देशमुख आणि सौ. क्षिप्रा डाखोडे देशमुख यांच्या सौजन्याने दिला जाणारा हा पुरस्कार ५ हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह अशा स्वरूपाचा आहे. अखिल भारतीय स्तरावरील एल्गार ग़ज़ल संमेलनात हा पुरस्कार दिला जात असल्यामुळे या सन्मानाचे महत्त्व अधिकच वाढले आहे. 'भुकेचा केंद्रबिंदू' या संग्रहाने अल्पावधीतच मराठी साहित्यविश्वाचे लक्ष वेधून घेतले आहे. यापूर्वी या संग्रहास शेगाव बुद्रुक येथील कवितेच्या घराचा बापुरावजी पेटकर राज्यस्तरीय




गजल पुरस्कार, हिमायतनगर येथील राज्यस्तरीय संवेदना सर्वोत्कृष्ट ग़ज़ल संग्रह पुरस्कार, तसेच नागपूर येथील साहित्य विहार संस्थेचा सर्वोत्कृष्ट गजल संग्रह पुरस्कार, असे तीन मानाचे राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त झाले आहेत. आता चौथ्या राज्यस्तरीय पुरस्काराची या संग्रहावर मोहर उमटणार आहे. या संग्रहात शंभर ग़ज़लांचा समावेश असून, भूक, बेरोजगारी, गरीबी, जातीय विद्वेष, धार्मिक कट्टरता, अंधश्रद्धा, शेतकरी आत्महत्या यांसारख्या ज्वलंत सामाजिक प्रश्नांची सखोल आणि संवेदनशील मांडणी गजानन वाघमारे यांच्या ग़ज़लेतून प्रत्ययास येते. सामाजिक वास्तवाचे विदारक दर्शन घडवितानाच प्रेम, विरह आणि मानवी भावनांचे तरल, सूक्ष्म पदरही त्यांच्या गजलेतून उलगडतात. त्यामुळेच त्यांच्या ग़ज़लेला केवळ विचारांची धार नाही, तर भावनांचा ओलावाही लाभतो. ११ एप्रिल २०२५ रोजी महागाव येथे ज्येष्ठ गजलनवाज पं. भीमराव पांचाळे यांच्या हस्ते 'भुकेचा केंद्रबिंदू' या संग्रहाचे प्रकाशन झाले होते. अवघ्या नऊ महिन्यांच्या कालावधीत चार राज्यस्तरीय पुरस्कारांनी हा संग्रह गौरविला जाणे, ही मराठी गजल क्षेत्रातील उल्लेखनीय घटना आहे. साहित्यिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या तुलनेने मागास मानल्या जाणाऱ्या महागाव तालुक्यासाठी हा गौरव अभिमानास्पद असून, गजानन वाघमारे यांच्या यशामुळे या परिसरातील नवोदित साहित्यिकांना नवी दिशा आणि प्रेरणा मिळत आहे. सामाजिक वास्तवाचे भान ठेवून लिहिलेली ग़ज़लही व्यापक वाचकप्रियता मिळवू शकते, हे 'भुकेचा केंद्रबिंदू'ने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

# नविन पनवेल मालेवाडी येथे प्रथमोपचार प्रशिक्षण शिबीर सपन्न

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** पनवेल / २ फेब्रुवार जो पर्यंत आपले शारीरिक आरोग्य चांगले आहे तो पर्यंत आपण दैनंदिन जीवनात तंदुरुस्त होय .कधी कधी दैनंदिन जीवनात वावरत असताना छोट्या मोठ्या शारीरिक इजा किंवा एखादा मोठा गंभीर आजार सुरू होत असताना त्याची प्राथमिक काळजी आपण स्वतःहून घ्यायला हवी यासाठी मालेवाडी,




पनवेल येथे ३१ जानेवारी २०२६ या दिवशी हिंदू जनजागृती समितीतर्फे प्रथमोपचार प्रशिक्षण आणि त्याचे दैनंदिन जीवनातील महत्त्व या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.प्रत्येक नागरिकाला प्रथमोपचाराचे ज्ञान असणे आवश्यक आहे,यादृष्टीने ठिकठिकाणी त्याविषयीचे प्रशिक्षण वर्ग घेतले जातात. याचाच एक भाग म्हणून मालेवाडी येथे प्रथमोपचार प्रशिक्षण वर्गाचे आयोजन केले होते.यावर्गामध्ये ९ जिज्ञासूनी सहभाग घेतला होता.

यात प्रथमोपचार प्रशिक्षणाचा उद्देश व आवश्यकता याबद्दल माहिती मिळाली. तसेच जखम झाल्यावर काय करायचे, पाय मुरगळला असेल तर काय करावे, तसेच इतर दुखापतींवर कसे प्रथमोपचार करायचे हे शिकायला मिळाले.हे ज्ञान घ्यायला आम्हाला आवडेल असे जिज्ञासूंनी सांगितलं त्यासोबतच या ज्ञानामुळे आपण स्वतःसुद्धा प्रथमोपचार करू शकतो हा विश्वास त्यांच्यामध्ये निर्माण झाला.

# रसाळ अर्बन को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि. मादळमोही शाखेचा सातवा वर्धापन दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**गेवराई प्रतिनिधी :भीमराव गावडे** : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा.अजितदादा पवार यांच्या अपघाती निधनाच्या दु:खद घटनेमुळे कार्यक्रम अत्यंत साधेपणाने व शोकाकुल वातावरणात पार पडला.

या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर,सरपंच,मा. सरपंच,चेअरमन,शेतकरी बांधव,पत्रकार,व्यापारी वर्ग, कर्मचारी वर्ग, तसेच गावातील तरुण-तरुणी व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या उपस्थितीने कार्यक्रमाला एक सुसंस्कृत व सन्माननीय रूप लाभले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. दीपक राक्षे यांनी प्रभावीपणे केले.

प्रमुख पाहुणे म्हणून श्री.क्षेत्र नगद नारायणगडाचे उत्तराधिकारी गुरुवर्य ह.भ.प.



संभाजी महाराज यांनी उपस्थित राहून आशीर्वादपर मनोगतातून मार्गदर्शन केले.

तसेच सोसायटीचे चेअरमन श्री. राजेश भैय्या रसाळ यांनी संस्थेच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या आर्थिक प्रवासाचा आणि प्रगतीचा सविस्तर आढावा उपस्थितांसमोर मांडला..

कार्यक्रमाच्या शेवटी श्री.भरत पवार सर यांनी उपस्थित सर्व मान्यवरांचे, पाहुण्यांचे व या सोसायटीच्या जडणघडणीत मोलाचे सहकार्य करणाऱ्या सर्वांचे मन:पूर्वक आभार मानले..!!

# अंबाजोगाई च्या कन्याची गगन भरारी; संकल्प विद्या मंदिर शाळेची तेजश्री झाली नॅशनल ड्रॅगन बोट चॅम्पियन

**दैनिक युवक आधार**

**केज प्रतिनिधी :** भारतीय कयाकिंग आणि कॅनोइंग असोसिएशन (IKCA).आयोजित नुकतीच, 14 वी राष्ट्रीय ड्रॅगन बोट चॅम्पियन शिपलोअर लेक, भोपाल, मध्य प्रदेश येथे 03-10 जानेवारी 2026 मध्ये पार पडली, ज्यात पंजाब ,महाराष्ट्र आणि राजस्थानसारख्या राज्यांनी पदके जिंकली, यामध्ये संकल्प विद्या मंदिर शाळेची विद्यार्थिनी कुमारी तेजश्री हनुमंत फड या विद्यार्थिनी अत्यंत उत्कृष्टरित्या स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन कांस्यपदक घेऊन नाविन्यपूर्ण यश प्राप्त केले आहे.याच्याबद्दल कुमारी तेजश्री व शिक्षक वृंदाचे, आई-वडील, मामा यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.या यशाबद्दल संकल्प विद्या मंदिर शाळेचे सचीव श्री.कैलास भागवत चोले, मुख्याध्यापिका श्रीमती बडे आर.एस.शाळेच्या ज्येष्ठ शिक्षिका श्रीमती कौशल्य शिंदे मॅडम व सर्व शिक्षक वृंद यांच्या वतीने तेजश्री चे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# भारतीय जनता पक्षाच्या तालूका कार्यकारीणीपदी रमेश राणे यांची निवड

**दैनिक युवक आधार**

**तालूका प्रतिनिधी/महादेव उप्पे :** देगलूर(दि.०२) मागील पंचवीस ते तीस वर्षापासून भारतीय जनता पक्षाशी एकनिष्ठ व पक्षसंघटनेसाठी जीवाची पर्वा न करणारे रमेश सिद्रामजी राणे यांची देगलूर कार्यकारीणी पदावर नियुक्ती करण्यात आली असून यावेळी हे नियुक्ती पत्र देगलूर बिलोली मतदार संघाचे आमदार जितेश रावसाहेब



अंतापूरकर,भारतीय जनता पक्षाचे तालुकाध्यक्ष ॲड.प्रितम बाळासाहेब देशमुख,मारोतीराव पाटील खुतमापूरकर, विजाभजचे जिल्हाध्यक्ष प्रा.शंकरराव राठोड,सादिक मरखेलकर यांच्या उपस्थितीत देण्यात आली आहे.या नियुक्तीबद्दल परिसरातील पदाधिकारी, व्यापारी वर्ग व मित्रमंडळीकडून अभिनंदनाचे वर्षाव होत आहे.

# भडगाव: शासनाची उदासीनता; ग्रामस्थांचा उपोषण इशारा – "उपोषणानंतर जाग येणार का?"

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्स्ना करवाडे/विदर्भ संपादिका**

**भडगाव (ता.जि. बुलढाणा) :**भडगाव येथील जिल्हा परिषद शाळा, पांदण, शेतरस्ते आणि पाणीपुरवठा या मूलभूत सुविधांची अवस्था बिकट आहे. विद्यार्थ्यांचे शिक्षण धोक्यात आले आहे, शेतकऱ्यांचे काम अडथळयांमध्ये अडकले आहे, आणि नागरिकांचे दैनंदिन जीवन सतत त्रस्त आहे.सामान्य नागरिक सतीश रमेश खडके यांनी २० जानेवारी २०२६ रोजी शासनाला निवेदन दिले, ज्यात वर्गखोल्या, पाणी, स्वच्छतागृह, बसण्याची सोय, पांदण व शेतरस्त्यांची खराब अवस्था यावर तात्काळ कारवाई करण्याची मागणी होती.ग्रामस्थांनी उपोषणाची तारीख ३ फेब्रुवारी २०२६ ठरवली; तरीही शासनाकडून एकही अधिकारी किंवा कर्मचारी उपस्थित राहिले नाही, एकही विचारपूस झाली नाही. त्यामुळे ग्रामस्थांचा सरळ सवाल शासनाकडे आहे –

"उपोषणानंतर शासनाकडून जाग येणार आहे का?"

निवेदनात ठोस मागण्या होत्या:

चार नवीन वर्गखोल्या बांधणे

पांदण व शेतरस्ते दुरुस्त करणे

शेतातील लाईन वेळ निश्चित करणे

तरीही शासनाच्या उदासीनतेमुळे अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही.भडगाव येथील नागरिकांचा संताप आता शिखराला पोहोचला आहे. गावकऱ्यांनी उपोषणाचा निर्णय घेतला असून, प्रशासनाने तात्काळ कारवाई केली नाही, तर उपोषण अंमलात येईल आणि त्याची जबाबदारी पूर्णपणे शासनावर राहणार आहे.

**ग्रामस्थांचा आवाज – संतापाचे स्वर**

ग्रामस्थांचा असा दावा आहे की, शाळा व रस्त्यांची बिकट अवस्था त्यांच्या रोजच्या जीवनावर थेट परिणाम करत आहे. शाळेतील विद्यार्थी वर्गखोल्यांमध्ये बसत आहेत, जेथे अनेक ठिकाणी भिंती फुटल्या, झोपड्या मोडलेल्या, आणि शाळा पाणी व स्वच्छतागृहाच्या अभावामुळे गंभीर परिस्थितीत आहे.शेतकऱ्यांचे कामदेखील पांदण व रस्त्यांच्या खराब अवस्थेमुळे अडथळयांमध्ये अडकले आहे. गावकऱ्यांचा असा म्हणणे आहे की, जर शासनाने ही समस्या तात्काळ सोडवली नाही, तर शेतकरी काम ठप्प आणि नागरिक जीवन अस्वस्थ होईल.सतीश रमेश खडके यांनी सांगितले,"आम्ही गेल्या महिन्यांपासून शासनाकडे अनेकदा निवेदन दिले, फोन केले, भेट दिली; तरीही एकही अधिकारी समस्या पाहण्यासाठी आले नाहीत. आता आमच्यासमोर एकच पर्याय आहे – उपोषण."ग्रामस्थांचा असा विश्वास आहे की, प्रशासनाने जर तात्काळ कारवाई केली नाही, तर उपोषण तालुक्यात चर्चा होईल आणि प्रशासनावर दबाव निर्माण होईल.

प्रशासनाला थेट आव्हान

भडगाव येथील नागरिकांचा स्पष्ट संदेश आहे –

"वरिष्ठ अधिकारी, तुम्ही ही समस्याकडे तात्काळ लक्ष देणार का, नाहीतर उपोषण अंमलात येईल? संपूर्ण तालुका या प्रकरणावर नजर ठेवत आहे!"गावातील नागरिकांनी हे ठळक केले की, उपोषण हे फक्त इशारा नाही, तर शासनासाठी जबाबदारीचा मुद्दा आहे. सतीश रमेश खडके यांनी गावकऱ्यांच्या बाजूने सातत्याने आवाज उठवला असून, हे प्रयत्न आता संपूर्ण तालुक्यात चर्चेचा विषय ठरले आहेत.

ग्रामस्थांचा ठळक संदेश – प्रशासनाला अंतिम इशारा

"उपोषणानंतर जाग येणार का?"

# उरण तालुक्यातील नवघर पंचायत समितीचे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे उमेदवार ॲड.रजनीकांत गणेश पाटील यांना तरूणांचा वाढता पाठींबा !!

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख / एम.डी.भोईर :** उरण तालुक्यातील पागोटे गावचे तरूण तडफदार उच्च शिक्षित पेशाने वकिल असलेले ॲड.रजनीकांत गणेश पाटील हे राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे उरण पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी आधिकृत उमेदवार म्हणून ५१ नवघर पंचायत समिती गणामधून घड्याळ या चिन्हावर निवडणूक लढवत असून सुशिक्षित बेरोजगार तरुण-तरुणींसह सामान्य नागरिकांचा वाढता पाठीबां पाहून त्यांचा विजय निच्छित असून विरोधकांच्या पायाखालची वाळू




सरकळी आहे.

ॲड.रजनीकांत गणेश पाटील हे सर्वसामान्य कुटुंबाती सुशिक्षित तरुण असून आपली वकीली करत असताना आपण आपल्या प्रकल्पग्रस्त शेतक-यांसाठी तसेच येथील प्रकल्पग्रस्त सुशिक्षित बेरोजगार तरूण/तरूणींसाठी आपल्या वकीलीचा फायदा व्हावा म्हणून सातत्याने त्यांची बाजू पडखडपणे माडून सुशिक्षित तरूण/तरूणींना न्याय देण्याचं काम करत आहेत.ॲड.रजनीकांत गणेश पाटील यांनी कामगार क्षेत्रात कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडून जेव्हा पागोटे गावच्या आजूबाजूला आसणा-या वेअर हाऊसींग गोडाऊन मधून कामगारांना कंपनीतून काढण्यात आले होते तेव्हा ॲड.रजनीकांत गणेश पाटील यांनी उपोषण करून तसेच कायदेशीर मार्गाने ९९ कामगारांना त्यांचा हक्काचा मोबदला मिळवून दिला होता.ॲड. रजनीकांत गणेश पाटील हे ग्राम विकास मंडळ पागोटे गावचे अध्यक्ष असून पागोटे व इतर आजूबाजूच्या गावातील रहिवासांच्या दैनदीन प्रश्नांना वाचा फोडली आहे.पागोटे गावासह आजूबाजूच्या गावांच्या सभोवताली आसणा-या सिडकोच्या मालकीच्या रस्त्यांवरील अनधिकृत पार्किंग,सुशिक्षित बेरोजगरांचा प्रश्न,ज्यांना नोकरीतून काढून टाकले त्यांना रोजगाराचे साधन उपलब्ध करून देऊन गावा-गावात स्वच्छतेचा प्रश्न असो किंवा पावसाच्या पाण्याचा निचरा योग्य प्रकारे करण्यास सिडकोला भाग पाडणे,वाढीव गावठाणाचा प्रश्न असो या आणि अनेक प्रश्नांवर वेळोवेळी आवाज उठवून योग्य त्या विभागाकडे पत्र व्यवहार करून वाचा फोडली आहे.ॲड. रजनीकांत गणेश पाटील यांनी विधी शाखेचे पदवीधर झाल्या नंतर त्यांनी कायद्याच्या आधारे येथील प्रकल्पग्रस्त सामान्य जनतेचे प्रश्न सेवाभाव वृत्तीने सोडविण्याचा प्रयत्न आजही चालूच आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस(अजित पवार) या पक्षाचे अधिकृत उमेदवार असल्याने आमचे नेते स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या प्रेरणेने प्रदेशाध्यक्ष मा.सुनीलजी तटकरे साहेब,महिला व बाल विकास मंत्री मा.अदितीताई सुनील तटकरे यांच्या माध्यमातून आपल्या भागाच्या विकासकामांसाठी जास्तीत जास्त निधी आणून येथील नागरिकांच्या निगडीत असणारे सर्वच प्रश्न सोडवण्याचे काम करणार असल्याचे आमच्या प्रतिनिधी जवळ निवडणूक विषयी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले.

## बारामतीतील विमान धावपट्टीवर प्रश्नचिन्ह

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** बारामती (पुणे) येथे उभारण्यात आलेल्या विमान धावपट्टीबाबत सुरक्षितता आणि नियमपालनाच्या दृष्टीने गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. महाराष्ट्र करणी सेनेचे प्रमुख अजय सिंह सेंगर यांनी या धावपट्टीच्या कार्यपद्धतीवर चिंता व्यक्त करत केंद्र सरकारकडे तक्रार केल्याची माहिती दिली आहे.

सेंगर यांच्या म्हणण्यानुसार, बारामती परिसरात सुरू असलेली ही विमान धावपट्टी आवश्यक मूलभूत सुविधा आणि सुरक्षा यंत्रणांशिवाय कार्यरत असल्याचा दावा करण्यात येत आहे. विमान वाहतुकीसाठी आवश्यक असलेली सिग्नल व्यवस्था, नियंत्रण प्रणाली आणि आपत्कालीन सुविधा या ठिकाणी अपुऱ्या असल्याचे ते सांगतात.

या पार्श्वभूमीवर, संबंधित यंत्रणांनी या धावपट्टीची सखोल तपासणी करावी आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक निर्णय घ्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे. नागरिकांच्या जीविताला धोका निर्माण होऊ नये, यासाठी खबरदारी घेणे गरजेचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

बारामती परिसरात यापूर्वी घडलेल्या एका दुर्दैवी विमान दुर्घटनेचा संदर्भ देत, अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी नियमांचे काटेकोर पालन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी आणि आवश्यक असल्यास सुधारात्मक पावले उचलावीत, अशी मागणी संबंधित अधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.

धावपट्टी तयार होताना मानवी जीवांच्या संदर्भात विचार केला नाही. बारामतीचा विकास करत असताना जर या धावपट्टीच्या तांत्रिक बाबी गांभीर्याने घेत त्या तांत्रिक बाबी उपलब्ध झाल्या असत्या तर अपघात झाला नसता असेही त्यांनी सांगितले.

## सोंडा येथील गजानन वाबळे यांची ग्राम रोजगार सहाय्यक संघटनेच्या 'वारला सर्कल प्रमुख पदी निवड

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील वाशिम:-** महाराष्ट्र राज्य ग्राम रोजगार सहाय्यक संघटनेच्या संघटनात्मक बांधणीला बळकटी देण्यासाठी नुकतीच जिल्हा व तालुका स्तरावर पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये सोंडा (ता. वाशिम) येथील ग्राम रोजगार सहाय्यक श्री. गजानन नारायण वाबळे यांची 'वारला सर्कल प्रमुख' म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

गजानन वाबळे हे मागील काही काळापासून सोंडा गावात ग्राम



रोजगार सहाय्यक म्हणून कार्यरत असून, नरेगा (MGNREGA) अंतर्गत मजुरांना काम मिळवून देणे आणि योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीत त्यांचा मोठा वाटा आहे. त्यांच्या याच कामाची दखल घेऊन संघटनेने त्यांच्यावर वारला सर्कलची जबाबदारी सोपवली आहे.

पुढील वाटचाल:

आपल्या निवडीनंतर बोलताना वाबळे म्हणाले की, "संघटनेने माझ्यावर जो विश्वास दाखवला आहे, त्यास मी पूर्णपणे पात्र ठरण्याचा प्रयत्न करेन. सर्कल मधील सर्व रोजगार सहाय्यकांच्या अडीअडचणी सोडवणे आणि प्रशासनासोबत समन्वय साधून मजुरांच्या हितासाठी कार्य करणे, हे माझे मुख्य उद्दिष्ट राहील."

त्यांच्या या निवडीबद्दल सोंडा ग्रामस्थ, तालुक्यातील रोजगार सहाय्यक मित्र आणि स्नेहीजनांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## फुलांऐवजी माणुसकी! स्नेहसंमेलनातून अनाथांसाठी मदतीचा ठाम आदर्श; सत्काराऐवजी समाजसेवेला मान; स्नेहसंमेलनाला नवी दिशा

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी** : स्नेहसंमेलन म्हणजे सत्कार, फुलांचे हार आणि दिखावा अशी रूढ ओळख मोडीत काढत कोपरगाव येथील के.जे. सोमय्या महाविद्यालयाच्या १९९५–९६ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी समाजभानाचा वेगळा व प्रेरणादायी आदर्श घालून दिला. सत्कारासाठी होणारा अनावश्यक खर्च टाळून तो निधी थेट समाजसेवेसाठी वापरण्याचा निर्णय घेत, या बॅचने स्नेहसंमेलनाला सामाजिक बांधिलकीची नवी दिशा दिली.

या स्नेहसंमेलनात शिर्डी येथील ‘साई सावली बालपरिवार’ या अनाथ व गरजू बालकांच्या शिक्षण व संगोपनासाठी कार्यरत असलेल्या संस्थेला आर्थिक मदत देण्यात आली.



फुलांच्या हारांऐवजी माणुसकीला प्राधान्य देत, डामडौलाला नकार आणि समाजकार्याला होकार देणारा हा निर्णय उपस्थितांमध्ये विशेष चर्चेचा विषय ठरला.

दीर्घकाळानंतर एकत्र आलेल्या माजी विद्यार्थ्यांनी मैत्री, आपुलकी व परस्पर सन्मान अनुभवत शालेय व महाविद्यालयीन जीवनातील आठवणींना उजाळा दिला. मात्र हा आनंद केवळ आठवणींपुरता न ठेवता, समाजाप्रती असलेल्या जबाबदारीची जाणीव अधोरेखित करण्यात आली. कार्यक्रमात कोणताही दिखाऊपणा न ठेवता साधेपणा, शिस्त आणि सामाजिक जाणीव यांना प्राधान्य देण्यात आले.

या स्नेहसंमेलनास नाशिक, अहिल्यादेवी नगर, पुणे, मुंबईसह महाराष्ट्राच्या विविध भागांतून माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली. यावेळी दिवंगत झालेले माजी विद्यार्थी, शिक्षक तसेच स्वर्गीय अजितदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बाजीराव गवारे, भारत जपे, विनोद दादा नाईकवाडे, राजेंद्र काशीद, राहुल रोहमारे, किरण आवारे आदी माजी विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. भविष्यातही अशाच सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचा संकल्प अनेक माजी विद्यार्थ्यांनी यावेळी व्यक्त केला.

## सणसर लासुर्णे जिल्हा परिषद गटात राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या घड्याळाचा जोरदार प्रचार

**दैनिक युवक आधार**

**सणसर:- विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील सणसर लासुर्णे जिल्हा परिषद गटातील मतदारांचा चांगल्या प्रकारे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या उमेदवारांना जोरदार प्रतिसाद मिळत असून अनेक तरुण नवीन मतदार यामध्ये सहभागी होत आहेत या गटाची जबाबदारी स्वतः युवकांच्या माध्यमातून मतदारांनीच हाती घेतली असल्याचे चित्र पाहायला मिळत असून अनेक मतदार देखील स्वतः घराच्या बाहेर पडून राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचा प्रचार करीत आहेत असे मत राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हा परिषद गट अधिकृत उमेदवार सौ माधुरी सागर भिसे तसेच सणसर गणातील पंचायत समिती उमेदवार ज्योस्त्ना मोहन सुरडकर यांनी आपले मत व्यक्त केले.

सणसर लासुर्णे जिल्हा परिषद व सणसर पंचायत समिती गणातील सणसर लासुर्णे बेलवाडी जाचकवस्ती भवानीनगर घोलपवाडी




उदमायवाडी सपकळवाडी या भागामध्ये मतदारांच्या घरोघरी जाऊन प्रचार करण्यात आला आहे.

यामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ला चांगला प्रतिसाद मिळत असून सर्वसामान्य जनतेच्या उमेदवारांवर विश्वास दाखवला यामुळे निश्चितच आम्ही हा विश्वास सार्थ करू तसेच आगामी काळात देखील निश्चितच राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वतीने चांगले काम या गणामध्ये करुन दाखवु असा विश्वास सणसर पंचायत समिती गणाचे अधिकृत उमेदवार कु ज्योस्त्ना मोहन सुरडकर तर जिल्हा परिषद गट सणसर-लासुर्णे सौ माधुरी सागर भिसे यांनी व्यक्त केली.

# वाशिम मेरा युवा भारत केंद्राच्या वतीने तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा संपन्न

### नेहरू युवा बहुउद्देशीम मंडळ "राजा प्रसेनजित संस्था केकतउमरा यांचा पुढाकार

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील** : 1 युवा कार्यक्रम एवं खेळ मंत्रालय भारत सरकार मेरा युवा भारत केंद्र वाशिम व नेहरू युवा बहुउद्देशीय मंडळ केकतउमरा आणि राजा प्रसेनजीत अल्पसंख्यांक शिक्षण बहुउद्देशीय संस्था यांच्या सहकार्याने वाशिम तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल वाशिम येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी कार्यक्रम अध्यक्षा श्रीमती वर्षा लाकडे मॅडम जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय क्रीडा मार्गदर्शक अक्षय टेम्भूरणे, क्रीडा विभाग विजय बोथडे, नॅशनल खेळाडू सुशांत कळढोणे, मा. राष्ट्रीय युवा स्वयंसेवक माय भारत प्रदिप पट्टेबहादूर, क्रीडा शिक्षक बब्रुवहन वैद्य, अनुप इंगळे, यांची उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते




स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये 15 ते 29 गटातील युवक युवती यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला होता. या क्रीडा स्पर्धेमध्ये मुलींकरिता 100 मीटर धावणे, लांब उडी आणि खो.खो स्पर्धा घेण्यात आल्या, तर मुलांकरिता 100 मीटर धावणे, गोळा फेक आणि कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आले होते. महिला 100 मीटर धावणे या स्पर्धेमध्ये प्रथम क्र.अर्पणा ठोके, द्वितीय क्र.आरुषी साबळे,तृतीय क्र. सांची उचित, पुरुष 100 मीटर धावणे स्पर्धेमध्ये प्रथम क्र. पवन गावंडे, द्वितीय क्र.विशाल भेंडेकर,तृतीय क्र. रवी शेळके यांनी पटकाविला, गोळा फेक स्पर्धेमध्ये पुरुष गट प्रथम क्र हर्षद मुठाळ, द्वितीय क्र. योगेश खरात, तृतीय क्र. रवी शेळके यांनी पटकाविला

महिला खो-खो स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक शिवाजी विद्यालय वाशिम, द्वितीय क्र. आदिवासी मुलीचे शासकीय वस्तीगृह वाशिम, तृतीय क्र. मागासवर्गीय त्याचा आर्थिक दृष्ट्या मागासवर्गीय मुलीची शासकीय वस्तीगृह सिव्हिलाईन यांनी पटकाविला तर प्रथम क्र. कबड्डी स्पर्धेमध्ये राधे राधे क्रीडा संघ वाशिम, द्वितीय क्र. श्री शिवाजी विद्यालय क्रीडा संघ वाशिम, तृतीय क्र. नवरंग बजरंग क्रीडा मंडळ यांनी पटकाविला. यावेळी विजेत्या सर्व स्पर्धकांना ट्रॉफी सन्मानचिन्ह मेडल प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

सदर कार्यक्रम हा मेरा युवा भारत केंद्र जिल्हा युवा अधिकारी स्नेहल बासुतकर मॅडम व कार्यक्रम अधिकारी अनिल ढेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो,माय भारत स्वयंसेविका कु. आकांशा गायकवाड यांनी केले. कामाचे प्रास्ताविक कार्यक्रमाची रूपरेषा नेहरू युवा मंडळ अध्यक्ष प्रदीप पट्टेबहादूर यांनी मांडली. या कार्यक्रमास विशेष सहकार्य राजा प्रसेनजीत अल्पसंख्यांक शिक्षण बहुउद्देशीय संस्था केकतउमरा प्रविण पट्टेबहादूर, पंच आतिश कांबळे,दत्ता काकडे,निलेश कोरणे, विशेष परिश्रम अतिश टापरे, आकांक्षा गायकवाड, अंजली इंगोले, निकिता पट्टेबहादूर व राजा प्रसेनजीत अल्पसंख्यांक शिक्षण बहुउद्देशीय संस्था केकतउमरा यांचे लाभले.

उपस्थित सर्वांचे आभार आतिश कांबळे यांनी मानले. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश युवा पिढीमध्ये क्रीडाविषयक आवड निर्माण करून त्यांचे शारीरिक, मानसिक व बौद्धिक आरोग्य सुदृढ करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता. ग्रामीण व शहरी युवक-युवतींना आपली क्रीडापटू गुणवत्ता दाखविण्यास व्यासपीठ उपलब्ध करून देणे, संघभावना, शिस्त व नेतृत्वगुणांचा विकास घडवून आणणे तसेच खेळाच्या माध्यमातून सकारात्मक जीवनमूल्ये रुजविणे हा या उपक्रमाचा हेतू होता.

# ट्रान्सजेंडर हक्क संरक्षण संवेदनशीलता कार्यक्रम; लोकप्रशासन व स्थानिक स्वराज्य शासन विभागाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग** : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात ट्रान्सजेंडर व्यक्तींचे हक्क संरक्षण संवेदनशीलता एक दिवसीय कार्यक्रम मंगळवार, दि. २ फेब्रुवारी २०२६ रोजी पार पडला. विद्यापीठाचा लोकप्रशासन व स्थानिक स्वराज्य शासन विभाग आणि भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयांतर्गत कार्यरत राष्ट्रीय सामाजिक संरक्षण संस्थेच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

लोकप्रशासन व स्थानिक स्वराज्य शासन विभागात आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान माननीय कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांनी भूषविले, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाच्या राष्ट्रीय सामाजिक संरक्षण संस्थेचे सल्लागार श्री. संजय पवार, गौरव ट्रस्ट नागपूरच्या NACO प्रकल्प व्यवस्थापक, प्रमुख प्रशिक्षक श्री. संजय पवार, मानव विज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी, लोकप्रशासन व स्थानिक स्वराज्य शासन विभाग प्रमुख डॉ. जितेंद्र वासनिक, प्राध्यापक व विभाग प्रमुख आणि सहयोगी प्राध्यापिका डॉ. सुप्रिया डेव्हिड आवर्जून उपस्थित होते. 'ट्रान्सजेंडर व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) कायदा, २०१९ आणि ट्रान्सजेंडर हक्क नियम, २०२० अंतर्गत' विषयावर आयोजित कार्यक्रमात लैंगिक विविधता, तृतीयपंथी व्यक्तींचे प्रत्यक्ष जीवनानुभव, मानसिक आरोग्यविषयक प्रश्न, कायदेशीर संरक्षण, समावेशकता व सामाजिक न्याय सुनिश्चित करण्यातील संस्थात्मक जबाबदाऱ्या याविषयी जागरूकता व संवेदनशीलता निर्माण करण्याबाबत विचार मंथन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. विद्यापीठ गीत गायनानंतर मान्यवरांचे औपचारिक स्वागत करण्यात आले.

कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. जितेंद्र वासनिक यांनी आपल्या मनोगतात संवेदनशीलता कार्यक्रमाचे महत्त्व अधोरेखित करत समावेशकता ही लोकशाही मूल्यांची केंद्रबिंदू असल्याचे नमूद केले. सामाजिक न्यायविषयक कायद्यांविषयी जागरूकता निर्माण करण्याची जबाबदारी शैक्षणिक संस्थांवर असून, भावी प्रशासकांना कायदेशीर ज्ञानासोबतच सामाजिक संवेदनशीलतेने सुसज्ज करणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. मानली क्षीरसागर यांनी समता, सन्मान व भेदभावमुक्ततेच्या संविधानिक मूल्यांवर भर दिला आणि सामाजिक परिवर्तनासाठी विद्यापीठांची भूमिका अधोरेखित केली. कायदेशीर संरक्षणे अस्तित्वात असतानाही तृतीयपंथी व्यक्तींना अजूनही व्यवस्थात्मक वंचनांचा सामना करावा लागत असल्याचे त्यांनी



नमूद केले आणि धोरण व अंमलबजावणी यातील दरी भरून काढण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी संवेदनशीलता, संवाद प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा असे आवाहन केले.

मुख्य अतिथी म्हणून उपस्थित असलेले भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाच्या राष्ट्रीय सामाजिक संरक्षण संस्थेचे सल्लागार श्री. संजय पवार यांनी तृतीयपंथी व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९ यामागील उद्देश, व्याप्ती व महत्त्व स्पष्ट केले. मंत्रालय व राष्ट्रीय सामाजिक संरक्षण संस्थेद्वारे राबविण्यात येणाऱ्या क्षमता-विकास, प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रमांची माहिती त्यांनी दिली. कल्याणकारी धोरणांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी शासकीय यंत्रणा व शैक्षणिक संस्था यांच्यातील सहकार्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

अधिष्ठाता डॉ. शामराव कोरेटी यांनी आपल्या भाषणात तृतीयपंथी व्यक्ती वरील अभ्यासाचे आंतर विद्याशाखीय स्वरूप यावेळी समजावून सांगितले. लैंगिक विविधतेचे प्रश्न सामाजिक, सांस्कृतिक, नैतिक व प्रशासकीय दृष्टिकोनातून अभ्यासले जाणे आवश्यक आहेत, असे त्यांनी सांगितले. सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या विषयावर कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल त्यांनी आयोजक विभागाचे कौतुक केले. मिशन विश्व ममत्व फाउंडेशन नागपूरच्या जनसंपर्क अधिकारी मोहिनी यांनी 'लैंगिक विविधता व तृतीयपंथी व्यक्ती परिचय' या विषयावर मनोगत व्यक्त करताना लिंग, लिंग ओळख, लिंग अभिव्यक्ती व लैंगिक कल यामधील संकल्पनात्मक भेद स्पष्ट केले. त्यांच्या वैयक्तिक व सामाजिक अनुभवांच्या आधारे तृतीयपंथीयांच्या ओळखीतील विविधतेवर प्रकाश टाकत त्यांनी गैरसमज व रूढ कल्पनांचे निरसन केले.

NACO व एमएसएसीएसचे प्रमुख प्रशिक्षक आणि गौरव ट्रस्ट, नागपूरचे प्रकल्प व्यवस्थापक श्री. संजय पवार यांनी "कलंक, भेदभाव व मानसिक आरोग्य : तृतीयपंथी व्यक्तींचे प्रश्न" या विषयावर मार्गदर्शन केले. सामाजिक कलंक, भेदभाव व बहिष्कारामुळे तृतीयपंथी व्यक्तींना चिंता, नैराश्य व सामाजिक अलगावासारख्या मानसिक आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागते, हे त्यांनी उदाहरणांद्वारे स्पष्ट केले. समावेशक आरोग्यसेवा, समुपदेशन व समुदाय-आधारित आधारयंत्रणा आवश्यक असल्यावर त्यांनी भर दिला.

तिरपुडे समाजकार्य महाविद्यालय नागपूरच्या माजी प्राचार्या डॉ. स्वाती धर्माधिकारी यांनी "तृतीयपंथी व्यक्ती (हक्कांचे संरक्षण) अधिनियम, २०१९ व नियम २०२०" या विषयावर संवाद साधत कायद्याच्या विविध तरतुदींचे सविस्तर विवेचन केले. स्व-ओळखीचा अधिकार, भेदभावाविरोधी संरक्षण, शिक्षण, रोजगार, आरोग्य, निवास व कल्याणकारी योजनांतील हक्क यांचा त्यांनी सखोल आढावा घेतला तसेच कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी संस्थात्मक जबाबदाऱ्यांवर प्रकाश टाकला.

"व्यवहारातील सहानुभूती : समावेशक सहभागासाठी व्यावसायिक कौशल्ये" या विषयावर मार्गदर्शन करताना डॉ. पायल चामटकर-पटनाईक यांनी सहानुभूतीचे व्यावसायिक व व्यवहारिक महत्त्व सांगितले. प्रशासकीय, शैक्षणिक व समाजकार्य क्षेत्रात समावेशक दृष्टीकोन व नैतिक संवेदनशीलता कशी विकसित करता येईल, यावर त्यांनी सविस्तर चर्चा केली. चिंतनशील आचरण, आदरयुक्त संवाद व पूर्वग्रह विसरून कार्य करण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाचे समारोपीय भाषण डॉ. सुप्रिया डेव्हिड यांनी केले. त्यांनी संवेदनशीलता कार्यक्रमाच्या मूलभूत उद्दिष्टांवर चिंतन करत तृतीयपंथीयांच्या हक्कांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कायदेशीर जागरूकतेसोबतच दृष्टिकोनातील बदल, सहानुभूती व नैतिक जबाबदारी आवश्यक असल्याचे नमूद केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एम.ए. द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी कु. अश्विनी भोंडे यांनी केले तर आभार शिक्षक श्रीवर्धन केकतपुरे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विभागातील शिक्षकवृंद अंकुश मराठे, रमण शिवणकर व शिक्षकेतर कर्मचारी कु. समिक्षा मेहर, श्रीमती अनुसया पाटील व श्री. संदीप बोरकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# मी अध्यक्षपदाच्या शर्यतीत नाही - प्रफुल पटेल

**दैनिक युवक आधार**

**दिल्ली / प्रतिनिधी :** आमच्या पक्षात निर्णय घेण्याची एक प्रक्रिया आहे. ती प्रक्रिया आम्ही करावी की इतरांनी ? असा सवाल करत मी राष्ट्रीय कार्याध्यक्ष असल्याने माझ्यावर ही प्रक्रिया पूर्ण करण्याची जबाबदारी आहे. त्यामुळे मी समोर येतो. राज्यात ही जबाबदारी खासदार सुनील तटकरेंवर आहे. त्यामुळे ते समोर येतात. त्यामुळे काम करताना आमची पदे भरण्याची जबाबदारी आमची आहे. अध्यक्षपदाच्या निवडीसाठी पक्षाची बैठक बोलवावी लागेल. जनभावनेचा आदर करून आम्ही निर्णय घेणार आहोत, असे प्रफुल्ल पटेल यांनी स्पष्ट केले. तसेच मी स्वत: राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या स्पर्धेत नाही, असे सांगत आम्हाला आमच्या पद्धतीने निवड करू द्या, असे त्यांनी स्पष्ट केले.

दोन्ही राष्ट्रवादीच्या विलीनीकरणाच्या दाव्यांवर बोलताना अजितदादांची माझ्याशी काही चर्चा झाली की नाही. त्यांचीच चर्चा झाली असं लोक म्हणत आहेत. विलीनीकरणाबाबत आम्हाला माहीत नाही असं होऊ शकत नाही. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत प्रत्येक पक्षाने वेगवेगळ्या ठिकाणी वेगवेगळी भूमिका घेतली. काही ठिकाणी आम्ही भाजपसोबत राहिलो. काही ठिकाणी शिंदे सोबत राहिलो. स्थानिक स्वराज्यमध्ये दादांनी सांगितलं आपण सर्व वेगवेगळे लढत आहोत. आपली मते विभागली तर फरक पडू शकतो. त्यामुळे शरद पवार गटाशी बोलून समन्वय घडवू असं अजितदादा म्हणाले होते. तेवढीच चर्चा झाली, असे सांगत प्रफुल्ल पटेल यांन विलीनीकरणाच्या चर्चा फेटाळून लावल्या. राष्ट्रवादी पक्षाच्या नेतृत्त्वाबाबत वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले आहे. अजित पवार यांच्यानंतर आता राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदी सुनेत्रा पवार विराजमान झाल्या आहेत. परंतु राष्ट्रीय अध्यक्षपद अजूनही रिक्त आहे. त्यामुळे या पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षाची कमान नेमकं कोण सांभाळणार याबाबत वेगवेगळे तर्कवितर्क लावले जात आहेत.

पटेल यांनी पुढे सांगितले की, आमच्या पक्षाबद्दल बोलताना कोणत्याही काल्पनिक गोष्टीवर मी बोलणार नाही. एवढंच सांगतो की, मी त्यांच्या सोबत पदाच्या हिशोबाने सर्वात ज्येष्ठ सहकारी होतो. माझी भूमिका अजितदादांच्या सुसंगत राहिली. तेव्हाच २०२३ रोजी आम्ही निर्णय केला. आम्ही त्यांच्या सोबत राहिलो. सर्व आमदार अजितदादां सोबत राहिले. त्यामुळे अजितदादांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी चालली. आमच्याकडे निर्णय घेण्याची प्रक्रिया आहे, असे प्रफुल्ल पटेल यांनी सांगितले.

# ट्रक मधील डिझेल चोरी करणाऱ्या दुकलीला पनवेल तालुका पोलिसांनी घेतले ताब्यात

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** पनवेल जवळील बई पुणे एक्सप्रेस हायवेवरील ॲमेटी युनर्व्हसीटी येथील ट्रक पार्कीगमध्ये उभ्या असलेल्या ट्रक मधील डिझेल चोरी करणाऱ्या दुकलीला पनवेल तालुका पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेल्या गाडीसह चोरीचे डिझेल असा मिळून जवळपास १ लाख ६२ हजार ६०० रुपयांचा मुद्देमालासह ताब्यात घेतले आहे.





फिर्यादी मोहम्मद साहिल लियाकत अली (वय २८) हे त्यांचे ताब्यातील कंटेनर ट्रक क्र. एचआर-६१/ई-६७४२ हा मुंबई पुणे एक्सप्रेस हायवेवरील ॲमेटी युनर्व्हसीटी येथील ट्रक पार्कीगमध्ये पार्क करुन विश्रांती घेत असताना तीन अनोळखी व्यक्तींनी फिर्यादी यांचे ट्रकमधील १५० लिटर डिझेल चोरी करुन पळून गेले म्हणुन अज्ञात चोरट्या इसमांविरूध्द पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल होताच वपोनि गजानन घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि गिजे, पोलीस उपनिरीक्षक राजपूत, पोहवा देवरे, कुदळे, तांडेल, धुमाळ, म्हारसे, बाबर, पोशी आकाश भगत आदींच्या पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रिक तपासद्वारे आरोपी प्रमोदकुमार दुर्गा सिंग(वय ३१) व अजय उर्फ उम्या गजानन खंदारे (वय १८ वर्ष) या दोघांना नवी मुंबई येथून ताब्यात घेतले आहे. व त्यांच्या कडून गुन्ह्यात वापरलेली सफेद रंगाची स्वीफ्ट डिझायर व १४० लिटर डिझेल असा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

# शिराळा येथे भागवत कथा सप्ताह प्रारंभ

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे: तालुका प्रतिनिधी दर्यापूर** : अमरावती जिल्ह्यातील शिराळा येथील श्री संत गजानन महाराज संस्थान मध्ये प्रगट दिनानिमित्त श्रीमद भागवत कथा दि.१.२.२०२६. ला.रोजी प्रारंभ झालाआहे. कथा वाचक ह भ प. रेणुकाताई जाधव चिखलीकर यांच्या वाणीतून होत आहे दैनंदिन कार्यक्रमात काकड आरती, हरिपाठ, कीर्तनासह विविध धार्मिक कार्यक्रम



होत आहे. काल्याचे किर्तन दि.८. फेब्रुवारीला ह भ प श्याम महाराज चौबे वाणीतून होणार आहे. शोभायात्रा दि.७ फेब्रुवारीला दुपारी २ वाजता दिंड्यासह पालखी गावातील प्रमुख मार्गावरून निघणार आहे.दि.८.२.२०२६ रोजी महाप्रसादाचे वितरण करण्यात येईल. या महोउत्सवास अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री श्री.मा. चंद्रशेखरजी बावनकुळे व. तिवसा मतदार संघाचे आमदा श्री.राजेशभाऊ वानखडे हे सदिच्छा भेट देतील. भाविक- भक्तांनी कार्यक्रमाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# नाशिक– छत्रपती संभाजीनगर महामार्गावर मृत्यूला आमंत्रण!

## विंचूर येथे ट्रॅक्टर–कारची भीषण धडक; चार जखमी, दोघांची प्रकृती गंभीर

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडांगे निफाड तालुका प्रतिनिधी** : नाशिक– छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील रखडलेले व निकृष्ट रस्त्याचे काम अपघातांना खुले आमंत्रण देत असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. सोमवारी दुपारी सुमारे चार वाजेच्या सुमारास विंचूर येथे ट्रॅक्टर आणि कार यांच्यात झालेल्या भीषण धडकेत चार जण जखमी झाले असून त्यापैकी दोघांची प्रकृती अत्यवस्थ आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मारुती सुझुकी कंपनीची इर्टिगा कार (MH 15 FT 9141) आणि ट्रॅक्टर (MH 15 AM 1429) यांची समोरासमोर जोरदार धडक झाली. अपघात इतका तीव्र होता की इर्टिगा कारचा पुढील भाग पूर्णतः चुरगळला गेला. घटनास्थळी भीषण दृश्य पाहून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेत जखमींना वाहनातून बाहेर काढले व तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल केले. यातील दोघांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नाशिक येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

या महामार्गावर सुरू असलेल्या रस्त्याच्या कामादरम्यान अपुरी वाहतूक



व्यवस्था, दिशादर्शक फलकांचा अभाव, रात्री अंधारात न दिसणारे अडथळे तसेच अचानक वळणे यामुळे अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. स्थानिक नागरिकांनी यापूर्वीही अनेकदा तक्रारी करूनही संबंधित यंत्रणेकडून ठोस उपाययोजना करण्यात आल्या नसल्याचा संताप व्यक्त केला आहे.

"आणखी किती निष्पाप जीव गेल्यावर प्रशासन जागे होणार?" असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. या प्रकरणी पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला असून, रस्त्याच्या कामामुळे निर्माण झालेल्या धोकादायक परिस्थितीस जबाबदार असलेल्या ठेकेदार व संबंधित विभागावर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

प्रशासनाकडून वाहनचालकांना सावधगिरीचा इशारा दिला जात असला, तरी जोपर्यंत रस्त्याचे काम दर्जेदार व सुरक्षित पद्धतीने पूर्ण होत नाही, तोपर्यंत नाशिक–संभाजीनगर महामार्ग अपघातांचे केंद्रच राहणार, अशी भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

# जय भवानी महाविद्यालयात लिंगसमानतेसाठी डिजिटल प्रतिज्ञा कार्यक्रम संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** :- पाटोदा येथील जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा यांच्या अंतर्गत (महिला) तक्रार निवारण समिती व राष्ट्रीय महिला आयोग – युवा मंथन कॅम्पस कॉलिंग प्रोग्राम यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २७ जानेवारी २०२६ रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात "डिजिटल प्रतिज्ञा : लिंगसमानतेसाठी" हा उपक्रम यशस्वीरीत्या राबविण्यात आला. या



कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांमध्ये लिंग समानता, महिलांविषयी आदर, तसेच सुरक्षित व सन्मानजनक शैक्षणिक वातावरण या बाबत जनजागृती करणे हा होता. या कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी डिजिटल माध्यमातून लिंगभेद नष्ट करण्याची, महिलांविरोधातील हिंसाचारास ठाम विरोध करण्याची, तसेच सर्वांना समान संधी व सन्मान देण्याची प्रतिज्ञा घेतली. कार्यक्रमात अंतर्गत (महिला) तक्रार निवारण समितीच्या पीठासीन अधिकारी प्रा. ज्योती रकटे यांनी लैंगिक छळ प्रतिबंधक कायदा, तक्रार निवारण प्रक्रिया तसेच राष्ट्रीय महिला आयोग–युवा मंथन उपक्रमाचे महत्त्व या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभलेला हा उपक्रम सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करणारा ठरला. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीरीत्या पार पडला. या कार्यक्रमास अंतर्गत (महिला) तक्रार निवारण समितीच्या पीठासीन अधिकारी प्रा.ज्योती रकटे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे प्रमुख प्रा.विनोद किर्दक, प्रा.डॉ.अशोक देवगुडे, प्रा. डॉ.वंदन जाधव, प्रा.सोमनाथ घाडगे, प्रा.डॉ.सुनील जाधव, प्रा.नारायण फुन्ने तसेच सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

## श्री गुरु माऊली प्रतिष्ठान आयोजित अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यात उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (प्रतिनिधी) :** श्री गुरु माऊली प्रतिष्ठान आयोजित अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री मा.श्री. एकनाथ शिंदे साहेब यांनी भेट दिली. तसेत राष्ट्रीय हिंदु ढोर समाज सेनेच्या दिनर्दर्शिकच प्रकाशन केले.ह.भ.प किर्तणकार अनंता महाराज कलाटकर यांची कीर्तण सेवा झाली. त्यांना शाल व श्रीफळ देऊन महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री मा.श्री.एकनाथ शिंदे साहेबांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी मा.श्री. परेश दादा चांळके, शिवसेनेचे विभाग प्रमुख, मा.श्री.गुरुमुख शिंग स्यान मा.नगरसेवक,राष्ट्रीय हिंदु ढोर समाज सेनेचे संस्थापकः श्री ज्ञानेश्वर चांदबोधले,कोकण विभाग अध्यक्ष श्री सुरेश



मुनेमाणिक, ठाणे जिल्हा अध्यक्ष श्री बाळाजी नारायणकर,कार्यअध्यक्ष व शिवसेना उपविभाग प्रमुख श्री बाबासाहेब साबणे, उपविभाग प्रमुख श्री मारुती भाळशंकर .राष्ट्रीय हिंदु ढोर समाज सेनेचे महाराष्ट्र प्रदेश संघटक श्री परमेश्वर कावळे.श्री शिवाजी महाराज पाटेकर, श्री रामेश्वर चांदबोधले श्री आकाश फसले. समाज सेविका सौ.प्रजक्ताताई चाळके, श्री नवनाथ चांदबोधले, बहुजन सेवाभावि संस्थेचे अध्यक्ष गौतम भालेराव व श्रीगुमाऊली प्रतिष्ठानचे सचिव ह.भ.प.श्री सर्जेराव बोधने, श्री गुरु माऊली प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ. राधा चांदबोधले सचिव सौ.कविता मुनेमाणिक सौ.सुवर्णा बाळाजी नारायणकर. सौ.मंगल फसले सौ दिपा नारायणे सौ.सुरेखा बोधने इत्यादी उपस्थित होते.

तसेच मा.श्री.एकनाथ शिंदे साहेबांना संत कक्कया ढोर समाज भवनची मागणी राष्ट्रीय हिंदु ढोर समाज सेनेच्या वतीने करण्यात आली व श्रीगुरु माऊली प्रतिष्ठानच्या वतिने जेष्ठ नागरीक वारकरी कट्टा ची मागणी केली.

## माता रमाई आंबेडकर जयंतीनिमित्त समता सैनिक दलाचे भरतीपूर्व प्रशिक्षण शिबिर; उत्कृष्ट सैनिकांना मेडल प्रदान

**दैनिक युवक आधार**

**नांदेड प्रतिनिधी : प्रकाश गवारे :** माता रमाई आंबेडकर यांच्या १२८ व्या जयंतीनिमित्त समता सैनिक दलाच्या वतीने महिला व पुरुषांसाठी एकदिवशीय भरतीपूर्व प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे प्रशिक्षण शिबिर रविवार, दिनांक १ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ९.३० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत नालंदा बुद्ध विहार, श्रद्धास्थळ भीमघाट, नांदेड येथे उत्साहात पार पडले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गौतमराव कांबळे (तालुका अध्यक्ष, भारतीय बौद्ध महासभा) होते. कार्यक्रमाचे उद्घाटन ईश्वर रावजी जोंधळे (शहर अध्यक्ष, भारतीय बौद्ध महासभा) यांच्या हस्ते करण्यात आले.

शिबिरासाठी मेजर जनरल सुरेश गजभारे यांनी प्रशिक्षक म्हणून मार्गदर्शन केले, तर कृष्णा गजभारे (सीनियर डिव्हिजन ऑफिसर) यांनी सहप्रशिक्षक



म्हणून प्रशिक्षण दिले.शिबिरास पूज्य भदन्त पंय्याबोधी थेरो व भिक्षू संघ आणि लॉर्ड बुद्धा चॅनलचे प्रतिनिधी मा. सदाशिव गच्छे सर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. प्रशिक्षण शिबिरात शिस्त, संघटन, राष्ट्रभक्ती, सामाजिक बांधिलकी व समता सैनिक दलाची भूमिका याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

माता रमाई आंबेडकर जयंतीनिमित्त आयोजित या प्रशिक्षण शिबिरात समता सैनिक दलामध्ये उत्कृष्ट कार्य व उल्लेखनीय सेवा बजावणाऱ्या सैनिकांचा मेडल प्रदान करून गौरव करण्यात आला. हे मेडल मेजर जनरल सुरेश गजभारे, तालुका अध्यक्ष गौतमराव कांबळे व शहराध्यक्ष ईश्वररावजी जोंधळे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

मेडल प्राप्त सैनिकांची नावे :
कृष्णा गजभारे
सदाशिव हनुमंते
केशव वाघमारे
आनंद जोंधळे
ऋषिकेश भदर्गे
प्रकाश गवारे
भगवान वाघमारे
उत्तम जोंधळे
देवानंद धोतराज

या सर्व बहादूर व कर्तव्यदक्ष सैनिकांचे उपस्थित मान्यवर तसेच समता सैनिक दलाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कोकरे ताई, आनंदरावजी जोंधळे, केशव वाघमारे, भगवान वाघमारे, ऋषिकेश भद्रे तसेच समता सैनिक दलातील महिला व पुरुष सैनिकांनी मोलाचे योगदान दिले. कार्यक्रमाच्या शेवटी उत्तम जोंधळे यांनी आभार प्रदर्शन केले.या कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन आदरणीय आनंदरावजी जोंधळे (शहर सचिव), आदरणीय विजय पोपुलर (शहर सचिव, संरक्षण विभाग) तसेच समता सैनिक दलाच्या सर्व जिल्हा व शहर शाखा संरक्षण विभागाच्या सहकार्याने यशस्वीरीत्या पार पडले.

## तिसऱ्या मुंबईच्या गोंडस नावाखाली भांडवलशाही रायगडच्या उंबरठ्यावर, जिल्हा परिषद निवडणूक भूमिपुत्रांच्या हक्कांची: हर्षवर्धन सपकाळ

■ नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्यास भाजपाकडून टाळाटाळ, विमानतळाला नरेंद्र मोदींचे नाव देऊनच दाखवा.
■ काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा रायगड जिल्ह्यात झंझावाती प्रचार



**दैनिक युवक आधार**

**रायगड / प्रतिनिधी :** हा देश मुठभर लोकांचा किंवा उद्योगपतींचा नाही तर सर्वसामान्यांचा आहे पण भूमिपुत्रांचा गळा आवळण्यासाठी भांडवलदार आसुसलेले आहेत, दोन गुजराती विकत आहेत तर दोन खरेदी करत आहेत असे चित्र देशात आहे. आता तिसऱ्या मुंबईच्या नावाखाली भांडवलदार रायगडच्या उंबरठ्यावर आले आहेत. जिल्हा परिषदेची ही निवडणूक भूमिपुत्रांच्या हक्कांसाठी आहे, आपली परंपरा कायम राखण्यासाठी एकसंध रहा आणि काँग्रेस मविआच्या उमेदवारांना विजयी करा, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी आज रायगड जिल्ह्यातील जासई, चिरनेर, सातिर्जे, चोंढी येथे प्रचार रॅलीत सहभाग घेतला. यावेळी ते म्हणाले की, जिल्हा परिषद निवडणुकीतील कार्यकर्त्यांचा उत्साह पाहता विजय आपलाच आहे हे आत्ताच दिसून येत आहे. रायगड जिल्हा परिषद निवडणुकीत काँग्रेस मविआला चांगले यश मिळेल व सत्तेच्या चाव्या काँग्रेसच्या हातात असतील. लोकनेते दि. बा. पाटील यांनी भूमिपुत्रांसाठी मोठा लढा दिला, आता पुन्हा भूमिपुत्रांसमोर भांडवलदारांचे मोठे संकट उभे ठाकले आहे. या भांडवलशाहीला थांबवण्यासाठी काँग्रेस मविआला विजयी करा असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

एका प्रश्नाला उत्तर देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि. बा पाटील यांचे नाव द्यावे ही मागणी काँग्रेस पक्षाने पहिल्यापासूनच केली आहे. पण देवेंद्र फडणवीस मात्र दि. बा. पाटील यांचे नाव विमानतळास देण्यास टाळाटाळ करत आहेत. आताच विमानतळाचे एनएम नाव दिसत आहे पण एनएमच्या आडून नरेंद्र मोदी हे नाव देण्याचा घाट घातला तर तो खपवून घेतला जाणार नाही, असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. यावेळी रायगड जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष महेंद्र घरत, राजाभाऊ ठाकूर यांच्यासह काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## अर्जुन भिसे यांना दादासाहेब फाळके २०२५ चा उत्कृष्ट सहाय्यक अभिनेता पुरस्कार

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले :** मराठी चित्रपटसृष्टीत आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारे अभिनेता अर्जुन भिसे यांना दादासाहेब फाळके चित्रपट युनियन तर्फे २०२५ चा "उत्कृष्ट सहाय्यक अभिनेता (Supporting Actor)" पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

अर्जुन भिसे हे दादासाहेब फाळके चित्रपट युनियन, सांगली जिल्हा यांचे वाईस प्रेसिडेंट म्हणूनही कार्यरत असून, चित्रपटसृष्टीतील कलाकारांच्या संघटनात्मक कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग आहे.

दादासाहेब फाळके चित्रपट युनियन चे अध्यक्ष अजित म्हामुनकर यांच्या मार्गदर्शनाखाली कलाकारांच्या न्याय हक्कांसाठी सातत्याने कार्य करत असून, कलाकारांच्या कलागुणांना




प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील भव्य स्वरूपात दादासाहेब फाळके पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या सोहळ्यात विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कलाकारांचा सन्मान करण्यात आला.

रितेश देशमुख निर्मित भव्य ऐतिहासिक मराठी चित्रपट "राजा शिवाजी" मध्ये अर्जुन भिसे यांनी साकारलेली "मावळा" ही भूमिका प्रेक्षकांच्या विशेष पसंतीस उतरली. त्यांच्या सशक्त आणि भावपूर्ण अभिनयाची दखल घेत यावर्षी कलाकारांमधून अर्जुन भिसे यांची "उत्कृष्ट सहाय्यक अभिनेता" पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.या सन्मानामुळे अर्जुन भिसे यांच्या अभिनय कारकिर्दीला नवा आयाम मिळाला असून, सांगली जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून त्यांच्यावर अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## श्री छत्रपती विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, वावोशी इयत्ता 12 वीच्या विद्यार्थ्यांसाठी आशीर्वाद सोहळ्याचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**खालापूर /संतोष शेवाळ :** इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी आशीर्वाद सोहळा वावोशी संकुल यामध्ये साजरा करण्यात आला याप्रसंगी प्रमुख अतिथी गोदरेज कंपनीचे सीएसआर चे मुख्य व्यवस्थापक श्री तानाजी चव्हाण , सेवा सामाजिक संस्था सातारा येथील युवराज भांडवलकर, सरपंच ॲड रमेश पाटील, उद्योजक संदीप पाटील उपस्थित होते. श्री तानाजी चव्हाण यांनी भविष्यामध्ये या छत्तीशी विभागांमध्ये अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत. त्यासाठी कौशल्यावर आधारित शिक्षण पद्धती असावी यावर ती भर दिला. श्री भांडवलकर यांनी स्पर्धा परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी कशा पद्धतीने उतरावे या पद्धतीचे मार्गदर्शन केले. ॲड रमेश पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या समोरील आव्हाने आणि त्याच जिद्दीने पुढे जाण्यासाठी प्रोत्साहित केले. विद्यालयाच्या प्राचार्य आर.डी. गावित



सर यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत भविष्यामध्ये आपल्या शाळेला विसरू नका असा संदेश दिला. कॉलेजच्या इन्चार्ज प्रा. शेळके पी. बी. यांनी आलेले सर्व प्रमुख अतिथी यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त करत भविष्यात शाळेच्या विकासासाठी आपली गरज आहे. आमच्या विद्यार्थ्यांना सहाय्य करा. असे मत व्यक्त केले. श्री संदीप पाटील यांनी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

याप्रसंगी प्रा.पाटील आर. एल, प्रा. गावंडे एस. एम, प्रा.पेरवी डी. डी. उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अनुष्का देशमुख हिने केले. व आभार कु. श्रावणी भोसले हिने मानले.

## कॉ.अरविंद मोरे सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल :** भारतीय कम्युनिस्ट पक्ष सध्या शतक महोत्सवी साजरा करीत आहे. या अनुषंगाने ज्यांनी आपल्या कामगार संघटनेच्या वतीने चांगले काम केले आहे त्यांच्या कार्याची नोंद घेऊन भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे भायखळा, मुंबई शाखेत सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमास कॉ. क्रांती जेजुरीकर, अध्यक्षा, कॉ चंद्रकांत जाधव, सदस्य, कॉ. नंदकुमार मळईकर, खजिनदार,कॉ. अरुण निंबाळकर, सचिव, कॉ. नीलम मळईकर, कॉ. रंजना निंबाळकर, सदस्य, रेखा मळेवाडकर, सदस्य, प्रकाश नार्वेकर, अध्यक्ष, कॉ. प्रकाश सावंत, कॉ. प्रथमेश मळईकर व नवीन पनवेल येथील सत्कारमूर्ती कॉ. अरविंद मोरे उपस्थित होते. याप्रसंगी बँक ऑफ महाराष्ट्र एम्प्लॉईज युनियन, मुंबईचे अध्यक्ष, कॉ.अरविंद मोरे यांचा स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा भारतीय कम्युनिस्ट पक्षातर्फे सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना कॉ. अरविंद मोरे म्हणाले की भारतीय कम्युनिस्ट पक्ष हा कामगार, शेतकरी, शेतमजूर व संघटित कामगारांच्या हितासाठी लढणारा पक्ष आहे. ह्या पक्षाने बरीच आंदोलनाने करून



कामगारांना न्याय मिळवून दिला आहे. जेव्हा-जेव्हा शोषण झाले तेव्हा-तेव्हा ह्या पक्षाने आंदोलन करून न्याय मिळवून दिला आहे. मी बँक ऑफ महाराष्ट्र मध्ये ३९ वर्षा पेक्षा जास्त सेवा केली आहे. मी बँकेच्या बहुसंख्य असलेली संघटना ए.आय.बी.ई.ए. संघटनेशी जोडल्या गेलो होतो. आम्ही संघटना म्हणून गेली ३४ वर्षे खाजगीकरणाच्या विरोधात लढा दिला आहे. त्यामुळे आज बँका ह्या राष्ट्रीयकृत म्हणजे सरकारी मालकीच्याच राहिल्या आहेत. हे फलित ए.आय.बी.ई.ए. संघटनेचे आहे. आता भविष्यात बँकांचे राष्ट्रीयकरण अबाधित राखायचे असेल तर बँक कर्मचारी आणि भारतीय नागरिकांनी एकत्रमिळून संघर्ष करणे ही काळाची गरज आहे. विशेष करून ह्या आंदोलनात तरुणांनी सहभागी होण्याचे त्यांनी आवाहन केले. कॉ.अरविंद मोरे यांनी त्यांचा सत्कार केल्यामुळे त्यांना बळ व प्रेरणा मिळाली असे सांगितले. तसेच त्यांनी भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे आभार मानले. तसेच न्याय आणि समानता मिळण्यासाठी भारतीय कम्युनिस्ट पक्षा आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले. याप्रसंगी कॉ. अरविंद मोरे यांनी स्वलिखित पुस्तक "कुतूहलाचा करिश्मा" हे पुस्तक पक्षाच्या वाचनालयास भेट दिले.

## माजी खासदार मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या ७५व्या अमृतमहोत्सवीवर्षानिमित्त दोन दिवसीय आंतरमहाविद्यालयीन निबंध लेखन व वक्तृत्व स्पर्धांचे यशस्वी आयोजन

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल :** जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल (अधिकारप्रदत्त स्वायत्त) च्या इंग्रजी विभागातर्फे संस्थेचे मार्गदर्शक व प्रेरणास्थान माजी खासदार मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब यांच्या ७५व्या अमृतमहोत्सवीवर्षानिमित्त दोन दिवसीय आंतरमहाविद्यालयीन निबंध लेखन व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन उत्साहात करण्यात आले.या स्पर्धांचा प्रारंभ ३० जानेवारी २०२६ रोजी निबंध लेखन स्पर्धेने झाला, तर ३१ जानेवारी २०२६ रोजी वक्तृत्व स्पर्धा पार पडली. या दोन्ही स्पर्धांचे आयोजन महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाच्या वतीने करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या वैचारिक क्षमतेला चालना देणे, अभिव्यक्ती कौशल्य विकसित करणे व सृजनशीलतेला व्यासपीठ उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांमध्ये महात्मा फुले आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, रामशेठ ठाकूर कॉलेज, खारघर, भागुबाई चांगू ठाकूर कॉलेज ऑफ लॉ तसेच के. बी. पी. कॉलेज, वाशी या विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. निबंध लेखन स्पर्धेत एकूण १७० विद्यार्थ्यांनी, तर वक्तृत्व स्पर्धेत ३५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

स्पर्धांचे निष्पक्ष व गुणवत्तापूर्ण मूल्यमापन करण्यासाठी बाह्य परीक्षकांची नियुक्ती करण्यात आली होती. यामध्ये प्रा. विशाल बोडले (सहाय्यक प्राध्यापक, इंग्रजी विभाग, एस.आय. ई. एस कॉलेज, नेरूळ), डॉ. रमेश यादव, प्रा. दुर्गादेवी मौर्या (रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, खारघर) , डॉ. राम भीसे (एस.आय.ई.एस. ग्रॅज्युएट स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी (स्वायत्त)) व डॉ. दीप्ती मंडलिक (ॲमिटी स्कूल ऑफ लँग्वेजेस, ॲमिटी युनिव्हर्सिटी, मुंबई) यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

स्पर्धेतील विजेत्यांना रोख बक्षिसे, आकर्षक चषक (ट्रॉफी) व प्रमाणपत्रे देऊन सन्मानित करण्यात आले. प्रथम क्रमांकास रु. ५,०००/-, द्वितीय क्रमांकास रु. ४,०००/- व तृतीय क्रमांकास रु. ३,०००/- अशी रोख बक्षिसे प्रदान करण्यात आली.

**निबंध लेखन स्पर्धेचे विजेते पुढीलप्रमाणे :**

प्रथम क्रमांक – प्रीती अरुण थोरात (प्रथम वर्ष विज्ञान शाखा)

द्वितीय क्रमांक – स्नेहा अस्त चौधरी (तृतीय वर्ष विज्ञान शाखा)

तृतीय क्रमांक – नुरुन्निहार मोहम्मद नजीम उद्दीन (प्रथम वर्ष कला शाखा)

**वक्तृत्व स्पर्धेचे विजेते पुढीलप्रमाणे :**

प्रथम क्रमांक – प्रिया शेषनाथ चौधरी (पदव्युत्तर पदवीधर विज्ञान शाखा- भाग २)

द्वितीय क्रमांक – जान्हवी भास्कर हातमोडे (पदव्युत्तर पदवीधर कला शाखा- भाग १)

तृतीय क्रमांक – साशा वायगंणकर (तृतीय वर्ष विज्ञान शाखा)

स्पर्धेच्या पारितोषिक वितरण समारंभासाठी मुख्य अतिथी म्हणून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य ॲड. राहुल घरत यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. पारितोषिक वितरण समारंभाचे प्रास्ताविक सादर करताना इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. आर. व्ही. येवले यांनी स्पर्धेची ध्येय-धोरणे आणि उद्दिष्ट्ये विषद केली.

पारितोषिक वितरण समारंभासाठी प्रमुख मुख्य अतिथी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य ॲड. राहुल घरत आपल्या भाषणात त्यांनी सर्व विजेत्यांचे अभिनंदन करत अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो तसेच त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाला चालना मिळते, असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस.के.पाटील यांनी अभिव्यक्तीचे महत्व समजावून सांगताना त्याचे व्यक्तिमत्वविकासात अनन्यसाधारण महत्व असल्याचे उधृत केले. प्रस्तुत कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंग्रजी विभागातील प्रा. के. एन.पाटील, तर आभार प्रदर्शन प्रा. आर. के. पाटील यांनी केले.

या दोन दिवसीय आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांना विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद लाभला. स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस.के. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. आर. व्ही. येवले, इंग्रजी विभागातील प्राध्यापक डॉ. एस. एन.परकाळे, प्रा. आर. के. पाटील, प्रा. के. एन.पाटील, प्रा. अम्मू उन्निकृष्णन, प्रा. एम. पी. पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले.

# छत्रपती शाहू महाराज शाळेला हॅपी स्कूल करण्यात आली

**दैनिक युवक आधार**
**खालापूरसंतोष शेवाळे :** या कार्यक्रमाचे उद्घाटन इनरव्हिल क्लब च्या माझी जिल्हा अध्यक्षा डॉ सावित्री रघुपती मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले. शाळेतील 10 वी च्या विद्यार्थ्यांना परीक्षेसाठी कशाप्रकारची तयारी करावी लागते या संदर्भात हिंदवी शाह हिने प्रशिक्षण दिले.




150 विद्यार्थ्यांना पेन व बिस्कीट वाटप करण्यात आले. तसेच शाळेत स्पोर्ट चे सामान,विविध पुस्तके, शाळेसाठी 2 व्हाईट बोर्ड,तसेच शाळेत बोलक्या भिंती रंगवून दिल्या गेल्या. हे सर्व काम इनरव्हिल क्लब खोपोली व क्लब मधील सर्व सदस्यांनी केलेल्या डोनेशन मधून केले गेले .या कार्यक्रमासाठी अध्यक्ष दिना शहा, आय पी पी जयश्री कलोशी, सेक्रेटरी मधुमिता पाटील, पास्ट डिस्ट्रिक्ट चेअरमन डॉ सावित्री रघुपती, आय एस ओ वर्षा शिवलकर, एक्झिक्युटिव्ह मेंबर्स दिव्या मश्रु,रमिला पटेल, पास्ट प्रेसिडेंट सारिका धोत्रे, मेंबर्स अरुणा,डॉ अर्चना जाखोटिया,तारा आणि मनीषा उपस्थित होते,

तसेच शाळेचे मुख्याध्यापक बिचकर सर व शाळेतील इतर स्टाफ उपस्थित होते.

# ट्रॅक ॲण्ड ट्रेल'च्या माध्यमातून मेळघाटातील पर्यटनाचा विकास - जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादक अमरावती :** मेळघाटमध्ये निसर्ग सौंदर्य अनुभवण्यासाठी पर्यटक येतात. याठिकाणी असलेल्या पर्यटनस्थळाशिवाय त्यांना जंगलातील भ्रमंती आणि निसर्गाशी एकरूप होण्याची सुविधा उपलब्ध होणे गरजेचे आहे. यासाठी ट्रॅक आणि ट्रेलसाठी मार्ग शोधण्यात येतील, यातून मेळघाटातील पर्यटनाचा विकास साधण्यात येईल, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.



मेळघाटातील पर्यटनाबाबत मेळघाट ॲडव्हेंचर क्लबने जिल्हाधिकारी कार्यालयात सादरीकरण केले. विदर्भातील वन पर्यटनामध्ये मेळघाट हा उत्तम पर्याय आहे. याठिकाणी पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी पर्यटनस्थळांच्या विकासासोबतच पर्यटनाचे विविध पर्याय देणे आवश्यक आहे. जंगल सफारी, साहसी पर्यटन यासह जंगल भ्रमंती हा पर्यायही देणे आवश्यक आहे. यासाठी वन विभागाने पर्यटकांची सुरक्षितता लक्षात घेऊन ट्रेकिंगसाठी मार्ग निवडावेत. आवश्यकता पडल्यास याठिकाणी स्वतंत्र गेट उभारण्यात यावे. याप्रकारचे पर्याय दिल्यास पर्यटक मेळघाटात थांबण्यास तयार होतील.

मेळघाटातील पर्यटनाबाबत युवकांना लक्ष ठेऊन समाजमाध्यमांवरून प्रसिद्धी करावी. यामुळे मेळघाटबाबत माहिती होण्यास मदत मिळणार आहे. शालेय विद्यार्थी आणि समूहाने येणारे पर्यटकांवर लक्ष केंद्रीत करावे. त्यांच्यासाठी निवास, फिरणे आणि जेवणाची उत्तम व्यवस्था उभारणे आवश्यक आहे. पर्यटकांच्या निवासाची व्यवस्था उत्तम दर्जाची असावी. याठिकाणी स्वच्छता आणि निटनेटकेपणा असणे आवश्यक आहे. सेमाडोह आणि कोलकास येथे राहण्याची व्यवस्था आहे. याठिकाणांची देखभाल, दुरूस्ती सातत्याने करावी. इतर ठिकाणी टेंटमध्ये राहण्याची व्यवस्था करण्यात येते. हा पर्यायही तपासून पाहण्यात यावा. आमझरी येथे साहसी खेळाची सोय करण्यात आली आहे. येथेही पर्यटक येतील, याचे नियोजन करावे.

सुविधा आणि सवलती दिल्यास त्यांचा मेळघाटातील पर्यटनाकडे कल वाढू शकेल. यासाठी पर्यटनाचे क्षेत्र विस्तारण्याची गरज आहे. धबधबे, ऐतिहासिक वास्तू ही केंद्र ठरवून पर्यटकांना त्याठिकाणी पायी नेण्यासाठी मार्ग तयार करण्यात यावे. या वाटेत नाश्ता, जेवण आदी व्यवस्था झाल्यास पर्यटकांसाठी एक चांगली सुविधा निर्माण होऊ शकेल. वन विभागाने पर्यटकांना राहण्याच्या व्यवस्थेसोबतच जंगल भ्रमंतीसाठी रस्ता शोधावा, असे निर्देश जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी दिले.

# क्रिकेट समालोचन क्षेत्रात प्रवीण टेंबे यांना दोनदा बाईक जिंकण्याचा बहुमान

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी /दीपक कांबळे :** तळोजा/ क्रिकेट समालोचन क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करणारे प्रवीण टेंबे यांना आतापर्यंत दोन वेळा बाईक मिळण्याचा मान मिळाला आहे. सलग दोन वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये 'लकी ड्रॉ'च्या माध्यमातून त्यांचे नाव निघाल्याने क्रीडाप्रेमींमध्येही ही बाब चर्चेचा विषय ठरली आहे.

पहिली बाईक प्रवीण टेंबे यांना 2022 मध्ये आयोजित करण्यात आलेल्या स्वर्गीय रामचंद्र मढवी प्रतिष्ठान, उसाटणे या स्पर्धेत मिळाली होती. या स्पर्धेचे आयोजन अनिल ढोपरी, योगेश मढवी आणि हितेंद्र मढवी यांच्या वतीने करण्यात आले होते. या स्पर्धेत एकूण 19 चिठ्ठ्यांमधून ड्रॉ काढण्यात आला होता. त्या लकी ड्रॉमध्ये प्रवीण टेंबे यांचे नाव निघाल्याने त्यांना पहिली बाईक प्राप्त झाली.

त्यानंतर दुसऱ्यांदा नुकत्याच पार पडलेल्या किरवली नाईट रजनी या स्पर्धेतही प्रवीण टेंबे (रा. वलप) यांना बाईक मिळाली. या वेळी एकूण 40 चिठ्ठ्या होत्या. ही स्पर्धा स्व. नारायण शेठ ग्रुप चषक अंतर्गत आयोजित करण्यात आली होती. आयोजक म्हणून प्रशांत पाटील, तेजु आणि क्रिकेट संघ किरवली यांनी पुढाकार घेतला. या स्पर्धेतील लकी ड्रॉमध्ये पुन्हा एकदा प्रवीण टेंबे यांचे नाव निघाल्याने त्यांना दुसरी बाईक मिळाली.




दरम्यान, लकी ड्रॉची घोषणा होत असताना कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणारे संदीप पाटील (रा. मुर्बीगाव) यांनीही मिश्किल शैलीत प्रतिक्रिया दिली. "माझ्या नशिबात बाईक नाही, पण प्रवीण लकी आहे. त्याला दुसऱ्यांदा हा मान मिळाला; मात्र आपल्या नशिबाला हा मान मिळाला नाही," असे म्हणत त्यांनी हलक्याफुलक्या शब्दांत खंत व्यक्त केली. त्यांच्या या वक्तव्यामुळे उपस्थितांमध्ये हशा पिकला आणि कार्यक्रमात आनंदाचे वातावरण निर्माण झाले.क्रिकेट समालोचन क्षेत्रात काम करत असताना दोन वेळा असा मान मिळणे हे निश्चितच प्रेरणादायी असून प्रवीण टेंबे यांचे क्रीडाविश्वातील योगदान आणि लोकप्रियता अधोरेखित करणारे ठरत आहे. तसेच आयोजकांनी दिलेल्या या सन्मानामुळे स्थानिक क्रीडाप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# इंग्लंडच्या चमूने भंडारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना पहेला येथील फेमस राजू चाय वाला यांच्या दुकानातून घेतला चहाचा आस्वाद




**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे भंडारा :** इंग्लंड येथील चमू भंडारा जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना आज दिनांक ३ फेब्रुवारी २०२६ रोज मंगळवार ला सायंकाळी ५ वाजता भंडारा तालुक्यातील पर्यटन स्थळ रावणवाडी व अंभोरा येथे भेट दिल्यानंतर चहाचा आस्वाद घेण्याकरिता पहेला येथील फेमस चायवाला राजू चवळे यांच्या दुकानावर भेट देऊन चाय पिल्यानंतर चहाचे कौतुक केले.

# महापौर ला स्वतंत्र बंगला गरजेचं...........!

वर्तमानात नागपूर षहराचे नाव देषातच नव्हे तर जागतिक पातळीवर ''माईन्स स्टोन'' मुळे नावलौकीक झाले आहे हे आपण सर्व जाणतो. पण, नागपूर षहरासाठी महापौर या व्यक्ती प्रथम नागरिक या नात्याने त्यांना प्रषासकीय कामासाठी स्वतंत्र बंगला नाही हि खंत विशयी माहिती वृत्तपत्रात वाचली व समाजमन सुन्न झाले. संत्रा नगरी, उपराजधानी षहर म्हणून प्रसिध्द आहे एवढया अफाट षहराला महापौर साठी स्वतंत्र बंगला नसणे, हे आपल्या सर्वांसाठी/ नागपूरकरांसाठी खेदाची बाब म्हणावी लागेल नाही काय?

किंबहुना आपल्या नागपूर षहरात सर्व सोयी उपलब्ध आहेत पण महापौरसाठी स्वतंत्र बंगला नसणे हे सर्वांसाठी दुदैव म्हणावे लागेल. स्वतंत्र व हक्काचा बंगला असणे आवष्यक वाटते हि मागणी अनेक वर्शापासुन प्रलंबित असल्याचे कळते आहे. पण यात कोणाचेही लक्ष नाही असे नुकतेच दिसुन आलेले आहे. या अफाट षहरात खुप सारे व्हीआयपी/व्हीव्हीआयपी, पाहुणे मोठी माणसे तसेच विविध षिस्तमंडळे येत असतात, बैठका होतात, भेटी गाठी घेणे सोयीचे व्हावे याकरीता महापौर यांना स्वतंत्र बंगल्याची गरज कुणाला वाटत नाही काय? नागपूर शहराला सध्या मेट्रोची सोयी उपलब्ध करून दिली आहे याअगोदर बÚयाच महापौरांनी विषेश स्तरावर प्रयत्न केले. परंतु त्यांच्या पदरात निराषा पडली असे वृत्तपत्रातुन नागपूरकरांना कळले तेव्हा बहुतेकांनी आश्चर्य व्यक्त केले.

वर्तमानात महापौर म्हणून सौ. निता ठाकरे या महिलेची निवड झालेली आहे. त्यामुळे येत्या काळात स्वतंत्र बंगल्याची मागणी जोर धरेल अषी अपेक्षा व्यक्त करत सर्व नविन नगरसेवकांना माझी वृत्तपत्राच्या माध्यमातुन अषी नम्र विनंती आहे की, नागपूर षहराचा भव्य डोलारा पाहून यावरील मागणीला समोर करून एक प्रकारची कर्तव्यता दाखविली तर आपले मनःपुर्वक आभार नागपूरकरांच्या माध्यमातुन निष्चितपणे होईल असे म्हणणे रास्त ठरावे.

सरतेशेवटी ........... आपल्या वाढते संत्रानगरी षहरासाठी महापौर ला स्वतंत्र बंगल्याची गरज नाही काय ? यावर महापालीका सभागृहात चर्चा होणे, मागणी होणे गैर आहे काय? याबाबत चर्चा गरजेची आहे. महानगर पालीकेच्या माध्यमातुन अनेक उपक्रम राबवितो तर बंगला बांधायला निधी नाही किंवा निधीचा अभाव असणे हे न षोभण्यासारखे आहे, असे नाही वाटत काय? संत्रानगरीत आपले लाडके मुख्यमंत्री व रस्ता वाहतुक मंत्री असुन सुध्दा ही वरील मागणी न होणे याला आपण काय म्हणावे ? याचे सर्वांना आष्चर्य वाटत आहे. सर्व नविन नगर सेवकांना विनंती आहे की, प्रशासकीय कामासाठी महापौरांना स्वतंत्र बंगल्याची गरज आहे अषी मागणी महापालीकेच्या सभागृहात सर्वांनी एकमुखी करावी जेणेकरून, येत्या भविश्यात आपल्याला नवीन ठिकाणी काही वेळी सोयीचे होण्यासाठी बैठका घेता येईल. हे सोनेरी स्वप्न लवकरच होण्यासाठी आदरणीय श्रीमान गडकरी साहेब तसेच आदरणीय श्रीमान देवेंद्र फडणवीस साहेब, थोडा वेळ काढुन या विशयाकडे थोडे लक्ष घातल्यास लवकरच होण्याची चिन्हे आपल्याला दिसेलच असा मला विष्वास आहे. आणि माझी खाती आहे की, लवकरच आपले सर्वांचे सोनेरी स्वप्न निष्चित रूपाने पूर्ण होईल अषी खात्री बाळगतो.

**शब्दांकन: विजय सरस्वती सिताराम सोनारघरे,**

# लोककलावंत पै. मजनूभाई शेख स्मृती गौरव पुरस्कार सोहळ्यात ग्रामीण कवी श्रीराम वि. घडे यांना राज्यस्तरीय 'युवा प्रेरणा पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :** अहिल्या नगर श्रीरामपूर (जि. अहिल्या नगर) येथील दोस्ती फाउंडेशनच्या वतीने आयोजित लोककलावंत पै. मजनूभाई शेख स्मृती गौरव पुरस्कार सोहळ्यात परभणी जिल्ह्यातील मौजे डुमनरवाडी येथील आणि सध्या सध्या तळेगाव दाभाडे ता. मावळ जिल्हा. पुणे येथील ग्रामीण कवी मा. श्रीराम विध्यासागर घडे यांना राज्यस्तरीय युवा प्रेरणा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.






याच पुरस्कार सोहळ्यात सर्व मान्यवर आणि सर्व चित्रपट कलाकार यांच्या हस्ते शापित ग्रंथ या लघुचित्रपटाचे प्रमोशन करण्यात आले आहे. चित्रपट दिग्दर्शक प्रमोद सूर्यवंशी,आमदार च्या भूमिकेत काम करणारे रज्जाक भाई शेख, आमदार च्या पत्नी म्हणून काम करणाऱ्या स्मिता देशमुख मॅडम हवालदार या भूमिकेत काम करणाऱ्या वंदना नागणे मॅडम आणि श्रीराम घडे हे कलाकार उपस्थित होते. ग्रामीण कवी श्रीराम घडे यांनी शापित ग्रंथ या लघुचित्रपटात हवालदार शिंदे यांची भुमिका साकारली आहे.

तसेच मराठी साहित्य क्षेत्रात सातत्यपूर्ण लेखन, सामाजिक विषयांवरील परखड मांडणी व युवा कविना मार्गदर्शन करणारे यांच्या साहित्यसेवेसाठी कवी श्रीराम घडे यांना युवा प्रेरणा हा पुरस्कार देण्यात आला आहे. या पुरस्कार सोहळ्या साठी कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. महावीरसिंग चौहाण, उदघाटक राणीताई सोनवणे,संदीप कुमार बोरकर,करण नवले, नानासाहेब डोंगरे,सुनीता वाळुंज,मोहिनीराज होन, प्रमोद सूर्यवंशी(शापित ग्रंथ चित्रपट दिग्दर्शक निर्माता), आणि स्वेता सावंत हे मान्यवर उपस्थित होते. आरटीओ च्या अधिकारी राणीताई सोनवणे यांच्या हस्ते ग्रामीण कवी श्रीराम घडे यांना युवा प्रेरणा पुरस्कार देण्यात आला. हा पुरस्कार दि. ३१ जानेवारी रोजी श्रीरामपूर येथे मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. या निवडीबद्दल साहित्यिक, सामाजिक व फिल्म क्षेत्रातून,ग्रामीण कवी श्रीराम घडे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# रायगडमध्ये कॉँग्रेस किंग मेकर : हर्षवर्धन सपकाळ

■ रायगडमध्ये महाविकास आघाडीचाच झेंडा : महेंद्रशेठ घरत
■ दिबांच्या जन्मभूमीत कॉंग्रेसचे प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ मैदानात!
■ महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचाराला तुफान प्रतिसाद!

**दैनिक युवक आधार**
**उलवे, प्रतिनिधी :** दिबांच्या जन्मभूमीत जासई येथे कॉंग्रेसचे प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी मंगळवारी(ता. ३)आले होते. यावेळी दिबांना आणि हुतात्म्यांना प्रांतांमध्ये हर्षवर्धन सपकाळ आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत आणि महाविकास आघाडीचे उमेदवार यांनी अभिवादन केले. त्यानंतर महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी काढलेल्या रॅलीला तुफान प्रतिसाद मिळाला.

यावेळी प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, " रायगडमध्ये कॉंग्रेस पक्ष किंग मेकरच्या भूमिकेत आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिबांच्या नावासाठी कॉंग्रेस पक्ष सुरुवातीपासून आग्रही आहे. केंद्र आणि राज्य सरकार उदासीन आहे, पण दिबांचे नाव दिल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही. कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांमधील उत्साह वाखाणण्याजोगा



आहे. त्यामुळे महाविकास आघाडीचे उमेदवार बहुमतांनी निवडून येतील."

यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, " जासई उरण तालुका ही दिबांची जन्मभूमी आहे. दिबांची कामगिरी देशपातळीवर अभिमानास्पद आहे. अद्याप नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला दिबांचे नाव दिलेले नाही, येथील भूमिपुत्र हे कधीच सहन करणार नाहीत. त्यामुळे महाविकास आघाडीच्या उमेदवारांना भूमिपुत्रांनी विजयी करून सरकारचा निषेध करावा, तेव्हा सरकार जागे होईल. महाविकास आघाडीचे उमेदवार बहुमतांनी निवडून येतील, असा मला शंभर टक्के विश्वास आहे. जासई, चिरनेर हे आमचे बालेकिल्ले आहेत. त्यामुळे महाविकास आघाडीचीच सत्ता येईल."जासई जिल्हा परिषद मतदार संघात डॉ. मनीष पाटील, चिरनेरमधून ॲड अविनाश ठाकूर हे कॉंग्रेसचे उमेदवार उभे आहेत. जास इ निर्मला घरत, चिर्ले प्रियंका मढवी, पंचायत समिती उमेदवार कविता पाटील, प्रारंभी गावंड हे सर्व उमेदवार महाविकास आघाडी म्हणून लढत आहेत.

जासई, दिघोडे, कोप्रोली येथील प्रचार रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. महाविकास आघाडीचेच उमेदवार बहुमतांनी निवडून येतील, असा विश्वास सर्व महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी बोलून दाखवला.

यावेळी कॉंग्रेसचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, श्रद्धा ठाकूर, प्रभारी डॉमनिक डिमेलो, माजी जिल्हाध्यक्ष आर. सी. घरत, उरणच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष भावना घाणेकर, उरण तालुकाध्यक्ष विनोद म्हात्रे, श्रुती म्हात्रे, उपाध्यक्ष रामनाथ पंडित, जयवंत पाटील, संजय ठाकूर, प्रेमनाथ म्हात्रे, महिला अध्यक्षा रेखा घरत, शेकापचे नरेश घरत, संतोष म्हात्रे, रवी घरत, बबन कांबळे आदी महाविकास आघाडीचे मान्यवर उपस्थित होते. यावेळी पिरकोन येथे स्नेह भोजनाचा आस्वाद पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी घेतला.

# आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय सुरगाणा येथे प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली आजीवन अध्ययन व विस्तार विभागांतर्गत स्पर्धा परीक्षा कार्यशाळा यशस्वीपणे संपन्न झाली

कार्यक्रमाचे पहिल्या सत्रात प्रमुख वक्ते श्री. आकाश ठोंबरे ( संचालक करिअर इन्स्टिट्यूट नाशिक) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनात सांगितले की, सुरगाणा तालुक्यातील खेडोपाड्यातील गरीब व गरजू तरूणांनी नोकरीच्या शोधात संधी मिळवण्यासाठी स्पर्धा परीक्षा संदर्भात जागृत झाले पाहिजे. शालेय शिक्षण वर्गातील क्रमिक पुस्तके विज्ञान, गणित, नागरिकशास्त्र, भूगोल, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र इतिहास, मराठी भाषा उत्तम ज्ञान, इंग्रजी विषयाचे ज्ञान व्याकरण ,वयाचे व वेळेचे भान, योग्य मार्गदर्शक, आरक्षण,सवलती यांचा फायदा घेऊन यशस्वी शिखर पार करीत असताना स्वःताला सिध्द केले पाहिजे असे आवाहन केले. कार्यक्रमाचे दुसऱ्या सत्रात वक्ते प्रवीण कदम (स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक नाशिक) यांनी सांगितले की, आदिवासी भागातील लोकांचे जुन्या जीवनपध्दती, इ. ११ वी पासून स्पर्धा परीक्षा तयारी सुरू केली पाहिजे बी. ए नंतर स्पर्धा परीक्षा देता येते, महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्यसेवा १७ पदे भरली जातात पोलीस निरीक्षक, गृप बी मध्ये उपनिरीक्षक पुर्व , मुख्य परीक्षा व मुलाखत




घेतली जाते एस टी आय साठी मुलाखत नसते पोलीस,सैनिक,वनरक्षक भरती यासंदर्भात माहिती दिली.

कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे शैक्षणिक पर्यवेक्षक प्रा. सुरेश भोये यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनात आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे.यात पुस्तकी ज्ञानाबरोबरच व्यक्तिमत्व विकास केल्याने होते रे आधी केले पाहिजे ह्या म्हणी प्रमाणे ज्ञान आणि गुण मिळवून स्वतःला झोकून दिले पाहिजे. स्पर्धा परीक्षा तयारीत यशस्वी होण्यासाठी यशस्वी अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन व प्रेरणा घेतली पाहिजे असे सांगत प्रा.भोये यांनी गारमाळ गावातील यशस्वी उपजिल्हाधिकारी डॉ. स्वाती थविल, उपजिल्हा अधिकारी प्रकाश थविल, पोलीस उपनिरीक्षक विनायक थविल यांचे उदाहरणे देत मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. कविता भोये यांनी केले तर आभार प्रा माधुरी गावित यांनी मानले .यावेळी कार्यक्रमाला महाविद्यालयाचे आयक्यूसी समन्वयक डॉ. चंद्रकांत पाटील, प्रा.सुभाष कामडी, प्रा.कृष्णा गांगोडे,प्रा.वर्षा जोशी, ओमकार धुम यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खरसई व मेंदडी येथे मतदान जनजागृतीचा जागर; शंभर टक्के मतदानासाठी ग्रामस्थांचा निर्धार

**दैनिक युवक आधार**

**म्हसळा : प्रतिनिधी शिरीष समेळ :** जिल्हापरिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाच्या स्वीप (SVEEP) कार्यक्रमांतर्गत तालुक्यातील आरसी व मेंदडी कोंड येथील आदिवासी वाडीत २० जानेवारी रोजी व्यापक मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. ग्रामीण व दुर्गम भागातील मतदारांपर्यंत मतदानाचे महत्त्व पोहोचवून शंभर टक्के मतदानाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

पंचायत समिती म्हसळा येथील गटशिक्षणाधिकारी श्री. साबळे, वरिष्ठ विस्तार अधिकारी श्री. अरविंद मोरे, झोनल ऑफिसर श्री. आनंद घरत यांच्यासह संपूर्ण स्वीप समितीच्या उपस्थितीत कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. मार्गदर्शकांच्या हस्ते रॅलीला हिरवा कंदील दाखविण्यात आला. गावातील प्रमुख मार्गांवरून काढण्यात आलेल्या या रॅलीत




विद्यार्थ्यांचा उत्साहपूर्ण सहभाग विशेष लक्षवेधी ठरला. हातात विविध संदेशपर फलक घेऊन “माझे मत – माझा हक्क”, “प्रत्येक मत अमूल्य आहे”, “लोकशाही मजबूत करा – मतदान करा”, “निर्भय मतदान करा” अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

रॅलीदरम्यान मतदारांना मतदानाचा घटनात्मक अधिकार, मतदार नोंदणी व नाव दुरुस्ती प्रक्रिया, मतदान केंद्रावरील सुविधा, तसेच ईव्हीएम व व्हीव्हीपॅट यंत्रणेची माहिती देण्यात आली. यासोबतच नैतिक मतदानाचे महत्त्व, अफवांपासून दूर राहण्याचे आवाहन आणि कोणत्याही प्रकारच्या प्रलोभनांना बळी न पडण्याचा संदेशही देण्यात आला. लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी प्रत्येक मतदाराचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे मार्गदर्शकांनी अधोरेखित केले.

या उपक्रमाला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. महिलावर्ग, युवक, स्वयंसेवी संस्था तसेच ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत रॅलीला यशस्वी केले. विशेषतः आदिवासी वस्तीतील नागरिकांपर्यंत थेट संवादातून मतदानाविषयी विश्वास आणि जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. अनेकांनी आगामी निवडणुकीत कुटुंबासह मतदान करण्याचा संकल्प व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या नियोजनात स्वीप समितीने केलेले सूक्ष्म नियोजन, स्थानिक प्रशासनाचे सहकार्य आणि ग्रामस्थांचा सकारात्मक प्रतिसाद यामुळे हा उपक्रम प्रभावी ठरल्याचे आयोजकांनी सांगितले. एकूणच आरसी व मेंदडी परिसरात आयोजित या मतदार जनजागृती रॅलीमुळे लोकशाही मूल्यांविषयी जागरूकता अधिक दृढ झाली असून आगामी निवडणुकांमध्ये मतदानाची टक्केवारी वाढण्यास हातभार लागणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# पाटोद्यात मोठ्या उत्साहात पार पडली मंथन प्रज्ञाशोध परीक्षा;तालुक्यातील २९१ विद्यार्थ्यांचा सहभाग

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी)** - सध्याच्या स्पर्धेच्या युगात बालवयापासूनच विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा. या उद्देशातून त्याच प्रमाणे विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची माहिती व्हावी, या हेतूने पाटोदा येथील ओम कोचिंग क्लासेस चे संचालक प्रा.सोमीनाथ खंडागळे यांच्या समन्वयातून रविवार रोजी मंथन अकॅडमी अहिल्यानगर संचलित मंथन प्रज्ञाशोध ही परीक्षा पार पडली. पाटोदा शहरातील संत बाळूदेव महाराज विद्यालय केंद्रावर तब्बल २९१ विद्यार्थ्यांनी या परीक्षेतून आपले टॅलेंट आजमावले आहे. सध्याच्या स्पर्धा परीक्षांच्या युगात विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा विषयी माहिती असणे गरजेचे आहे. या हेतूने मागील ६ वर्षांपासून मंथन प्रज्ञाशोध ही बालवयासाठी जनरल नॉलेज तसेच इतर उपयुक्त विषयांवर




**विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण होते; चांगला प्रतिसाद**

**विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण व्हावी, त्याची तयारी व्हावी या सारख्या उदात्य हेतू घेणारे पहिले पाऊल म्हणून मंथन ही परीक्षा घेण्यात येत असून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात वाढ व्हावी या साठी ही परीक्षा आयोजित करण्यात येत आहे. या मध्ये राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय आणि केंद्रस्तरीय अशी बक्षिसे देण्यात येणार असून सध्याच्या स्पर्धा परीक्षांच्या युगामध्ये विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे स्वरूप माहिती व्हावे याच उद्देशाने या परीक्षेचे आयोजन आपण करत आहोत. पाटोदा तालुक्यात विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे.**

**प्रा.सोमीनाथ खंडागळे,**
**परीक्षा समन्वयक पाटोदा**

आधारित स्पर्धा परीक्षा घेण्यात येते. पहिली ते आठवीचे विद्यार्थी या परीक्षेमध्ये सहभागी होतात. या परीक्षांमध्ये भाषा गणित, बुद्धिमत्ता, इंग्रजी अशा विषयांमध्ये परीक्षा होते. पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांना भाषा, गणित, इंग्रजी आणि परिसर अभ्यास असा एकच पेपर तर तिसरी ते आठवी च्या विद्यार्थ्यांना भाषा गणित, बुद्धिमत्ता, इंग्रजी, विज्ञान भूगोल या विषयांवर आधारित ७५ प्रश्न संख्या असलेले दोन पेपर असतात. पहिली आणि दुसरीच्या विद्यार्थ्यांना १५० गुणांची तर तिसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना ३०० गुणांची ही परीक्षा प्रत्येक वर्षी घेण्यात येत आहे. पाटोदा तालुक्यात या परीक्षेला विद्यार्थ्यांकडून आता चांगला प्रतिसाद मिळत असून यंदा तब्बल २९१ विद्यार्थ्यांनी पाटोदा शहरातील संत बाळूदेव महाराज/महिला महाविद्यालयात येथे ही परीक्षा दिली. या परीक्षेसाठी संत बाळूदेव महाराज विद्यालयाचे मुख्याध्यापक व शिक्षक वृंदांचे तसेच तालुकाभरातून आलेल्या शिक्षकांचे अनमोल सहकार्य मिळाले.

# विजय वाठोरे यांना " डॉ.बाबासाहेब आंबेडकर युवा पत्रकारिता पुरस्कार " जाहीर

**दैनिक युवक आधार**

**ता. प्रतिनिधी/माधव काईतवाड बोरगडीकर/ हिमायतनगर :-** तालुक्यातील युवा पत्रकार तथा सामाजिक कार्यकर्ते म्हणून सर्व परिचित असलेले मौजे सरसम (बु) येथील साहित्यिक,पत्रकार विजय नारायण वाठोरे यांना त्यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील योगदानाबद्दल



अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषद यांच्यातर्फे दिला जाणारा " डॉ.बाबासाहेब आंबेडकर युवा पत्रकारिता पुरस्कार २०२६ " जाहीर झाला आहे. पुरस्कार जाहीर झाल्याचे निवडपत्र अखिल भारतीय गुरु रविदास समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष इंजिनियर चंद्रप्रकाश देगलूरकर यांनी त्यांना दिले आहे.

हिमायतनगर तालुक्यामध्ये धडाडीने अन निडरपणे सातत्याने गोर गरीब,वंचित शोषितांचे प्रश्न, समस्या आपल्या लेखणीतून प्रखरपणे मांडणारे तसेच जनसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांचा आवाज बुलंद करत प्रशासनावर जबरी पकड ठेवून अनेकांना पत्रकारिता क्षेत्रातून मदत करणारा पत्रकार,समाजसेवक म्हणून विजय नारायण वाठोरे यांची सबंध हिमायतनगर तालुक्यासह नांदेड जिल्ह्यामध्ये एक वेगळी ओळख आहे.आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ते म्हणून सर्वपरिचित आहेत. ते पद्मश्री नामदेव ढसाळ यांनी संस्थापित केलील्या " दलित पॅंथर " या लढाऊ,विद्रोही संघटनेचे हिमायतनगर तालुका अध्यक्ष म्हणून कार्य करत आहेत.यापूर्वीही त्यांनी अनेक पत्रकारिता, सामाजिक संघटनांचे तालुकाध्यक्ष, जिल्हाध्यक्ष तथा विविध पदभार सांभाळलेला आहे. सध्या ते दैनिक लोकशक्तीचे नांदेड जिल्हा प्रतिनिधी असून नमस्ते हिमायतनगर, महाराष्ट्र पर्व लाईव्ह न्युज,हिमायतनगर डायरी यासारख्या सोशल मीडिया चॅनलचीही ते संपादक म्हणून कार्य करत आहेत.

पत्रकार विजय वाठोरे यांना यापूर्वीही पत्रकार क्षेत्रामध्ये दिलेल्या योगदानाबद्दल उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार २०२५, संवेदना राज्यस्तरीय पत्रकारिता पुरस्कार २०२५ हे पुरस्कार मिळालेले आहेत. हा पुरस्कार विजय वाठोरे यांना रविवार दिनांक १५ फेब्रुवारी २०२६ रोजी शिवपार्वती मंगल कार्यालय भावसार चौक नांदेड येथे पुरस्कार वितरण सोहळा या कार्यक्रमात देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

पत्रकार विजय वाठोरे यांना पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल दलित पॅंथर चे राष्ट्रीय अध्यक्ष बुद्धभूषण गोटे, दलित पॅंथरच्या प्रदेशाध्यक्ष प्रियंका बागुल,वंचित बहुजन आघाडीचे नांदेड जिल्हा उपाध्यक्ष तथा जेष्ठ पत्रकार गंगाधर वाघमारे,दैनिक लोकशक्तीचे मुख्य संपादक विजयजी लेंडाळ, कार्यकारी संपादक इमरान शेख,दैनिक लोकशक्तीचे मराठवाडा विभागीय संपादक तथा नगरसेवक प्रतिनिधी रमेश पंडित,सा. वृत्त वारसदार चे मुख्य संपादक त्रिरत्नकुमार भवरे,दै विर शिरोमणी चे मुख्य संपादक शंकरसिंह ठाकूर, दै नंदगिरीचा कानोसा चे मुख्य संपादक मारोती शिकारे,पत्रकार दाऊ गाडगेवाड,माधव काईतवाड विष्णू जाधव,दिलीप शिंदे,नागेश शिंदे,गंगाधर गायकवाड,सोपान बोंपीलवार,मारोती वाडेकर,ज्ञानेश्वर पंदलवाड,नागोराव शिंदे,अंगद सुरोशे,अल्ताफ शेख,पाशा खतीब,विनोद चंदनवार,लिंगोजी कदम,प्रभू कदम,सेवानिवृत्त मुख्याध्यापक संभाजी वाठोरे, शिक्षिका बेबीनंदा बाबासाहेब सोनवणे,मुंबई उच्चन्यायालयाचे लिपिक सुमेध वाठोरे,आस्था क्लिनिक पासदगाव चे डॉ.संदेश वाठोरे,वडील नारायण चोखाजी वाठोरे,आई कालिंदा वाठोरे,राजरतन वाठोरे,संघप्रिया कवडे,लंकेश चंद्रमणी वाठोरे,आचल वाठोरे,प्रतीक्षा बगाटे,दक्ष कवडे, खुशी कवडे,राज गाडेकर, विजय धोबे,गझलकार चंद्रकांत कदम यांच्यासह अनेकांनी शुभेच्छा देत अभिनंदन केले आहे.

# सोन्या-चांदीच्या भाववाढीचे लग्नसराईवर संकट

सोने आणि चांदीच्या दराने पुन्हा एकदा नवा विक्रम केला आहे. सोन्याची किंमत प्रति तोळा १ लाख ८० हजार रुपये तर चांदीची किंमत प्रति किलो ४ लाख १० हजार रुपयांच्या जवळपास आहे. सोने आणि चांदीत झालेल्या दरवाढी मागे कारणे अनेक आहेत. मुख्यत्वे जागतिक अनिश्चितता, भू-राजकीय तणाव (उदा. मध्यपूर्वेतील संघर्ष), अमेरिकन फेडरल रिझर्व्हने व्याजदरात केलेली कपात आणि डॉलरची घसरण ही प्रमुख कारणे आहेत. सोने आणि चांदीच्या दरात गेल्या वर्षांपासून सुरू असलेली दरवाढ ही सराफ व्यापाऱ्यांना आणि सामान्य ग्राहकांसाठी चिंतेची बाब बनली आहे. लग्न सराई, सण-उत्सव आणि कोणत्याही शुभ कार्यासाठी सोने-चांदी खरेदी करणे ही भारतीयांची परंपरा आहे. पण अचानक दिवसागणिक होणारी दरवाढ ही सराफ बाजाराचा समतोल बिघडवणारी आहे. नोव्हेंबर ते जून हे महिने भारतीय दिनदर्शिकेनुसार लग्नसराईसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जातात. याच काळात सोने आणि चांदीच्या दागिन्यांच्या खरेदीसाठी सामान्य ग्राहक बाजारात येतात. लग्नासारख्या शुभ कार्यासाठी साधारण प्रत्येक ग्राहकाची क्षमता ही ३ ते ५ तोळे सोने खरेदी करण्याची असते. पण अचानक झालेल्या भाववाढीमुळे ग्राहकांची ही क्रयशक्ती घटल्याचे सराफ व्यापाऱ्यांकडून सांगितले जात आहे.

पारंपरिक भारतीय समाजात, लग्नावेळी मुलीला दिले जाणारे सोन्याचे दागिने हे तिचे स्त्रीधन मानले जाते. हे दागिने



तांत्रिकदृष्ट्या स्त्रीच्या मालकीचे असतात, जे तिला भविष्यात कोणत्याही आर्थिक अडचणीच्या वेळी स्वावलंबन आणि सुरक्षा देतात. कुटुंबाकडे किती सोने आहे, यावरून अनेकदा समाजातील त्यांची पत किंवा श्रीमंती मोजली जाते. मोठ्या समारंभात किंवा लग्नात सोन्याचे दागिने घालणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाते. मुलीला किती तोळे सोने घातले, असा प्रश्न सर्रास प्रत्येक लग्नात आप्तेष्टांकडून विचारला जातो. परंतु हाच प्रश्न विचारणंदेखील आता अवघड होऊन बसलंय.

सामान्य कुटुंबात लग्नसराईत सोने खरेदी करणे हे मोठे कार्य असते. सोन्या चांदीची खरेदी पकडून लग्नाचे बजेट हे ५ ते ७ लाख असते. ३ ते ५ तोळे सोने, एखादे चांगले मंगल कार्यालय, पंचपक्वानाचं जेवण, त्यातल्या त्यात उंची कपडे आणि थोडासा डामडौल असे लग्नाचे स्वरूप असते. सोन्याच्या किमती वाढल्यामुळे हेच बजेट पूर्णपणे कोसळले आहे. लग्नाचे संपूर्ण बजेट हे एकट्या सोन्याच्या दागिन्यांसाठी लागत असल्याची खंत लोकांकडून व्यक्त केली जात आहे. वाढलेल्या किमतींमुळे मध्यमवर्गीयांच्या बजेटबाहेर सोने गेले आहे. यामुळे दागिन्यांच्या विक्रीत मोठी घट झाली असून ग्राहक आता केवळ लग्नसराईसाठी आवश्यक तेवढेच सोने खरेदी करत आहेत.

भारतीय लग्नकार्यात सोन्याची चेन, मंगळसूत्र, अंगठी आणि बांगड्या. तर चांदीच्या दागिन्यांमध्ये जोडवी आणि पैंजण या गोष्टी अनिवार्य मानल्या जातात. परंतु, सध्याच्या वाढत्या दरांमुळे ही खरेदी आता आवाक्याच्या बाहेर गेली आहे. लग्नाचे बजेट ठरवताना सोन्या चांदीच्या दागिन्यांचा वाटा इतका मोठा झाला आहे की, इतर खर्चात कपात करण्याची वेळ कुटुंबांवर आली आहे. गृहिणी आपल्या संसारातील पै-पै वाचवून सणासुदीला एखादा छोटा दागिना घेण्याची जिद्द बाळगतात, पण सोन्याच्या दुकानातील पाटीवरील दर पाहून ग्रॅममध्ये सोने-चांदी घ्यावे लागत आहे. सराफ बाजारातील विक्रेत्यांनी याबाबत नवी माहिती दिली आहे. सोन्याचे दर प्रतितोळा विक्रमी पातळीवर पोहोचल्याने सामान्य ग्राहकांसाठी २२ किंवा २४ कॅरेटचे दागिने खरेदी करणे आता आवाक्याबाहेर जाऊ लागले आहे. अशा परिस्थितीत, ग्राहक १८ कॅरेट सोन्याचे दागिने खरेदी करण्यास प्राधान्य देत आहेत. एकेकाळी केवळ हिऱ्यांच्या दागिन्यांसाठी वापरले जाणारे १८ कॅरेट सोने आता नियमित दागिन्यांसाठीही लोकप्रिय ठरत आहे. २४ कॅरेट सोने अत्यंत मऊ असते, तर २२ कॅरेटमध्येही लवचिकता असते. १८ कॅरेटमध्ये ७५ टक्के सोने आणि २५ टक्के इतर धातू (तांबे, चांदी किंवा झिंक) असतात. यामुळे हे सोने अधिक कडक आणि मजबूत असते. रोजच्या वापराच्या अंगठ्या, चेन किंवा बांगड्यांसाठी १८ कॅरेट अधिक टिकाऊ ठरते.

सोन्या-चांदीच्या वाढत्या दरांमुळे ग्राहकांमध्ये भीती आणि सावधगिरीचे वातावरण आहे. ज्या कुटुंबात लग्नसराई आहे, त्यांनी सोन्याच्या खरेदीत हात आखडता घेतला आहे. उदा. पूर्वी जर एखादा ग्राहक ५ तोळे सोने घेणार असेल, तर आता तो ३ तोळ्यांवर समाधान मानत आहे. पैसे वाचवण्यासाठी आणि कमी पैशात जास्त दागिने खरेदी करण्यासाठी १८ कॅरेटच्या दागिन्यांना ग्राहक पसंती देत आहेत. यासोबतच नवीन सोने खरेदी करण्यासाठी पैसे कमी पडत असल्याने, अनेक ग्राहक घरातील जुने सोने मोडून त्या बदल्यात नवीन दागिने घडवून घेत आहेत. सोन्याच्या दागिन्यांसाठी द्यावा लागणारा जीएसटी आणि घडणावळ ही देखील ग्राहकांसाठी खर्चिक बाब आहे. तुम्ही २४ कॅरेट, २२ कॅरेट किंवा १८ कॅरेट कोणत्याही शुद्धतेचे सोने खरेदी केले, तर सोन्याच्या एकूण किमतीवर ३ टक्के जीएसटी आकारला जातो. तर घडणावळीवर ५ टक्के जीएसटी आकारला जातो. सोप्या शब्दात सांगायचं झालं तर तुम्ही १ लाखाचे सोने घेतले तर त्यावर ३ टक्के म्हणजेच ३००० रुपये जीएसटी आकारला जाईल. त्याची घडणावळ म्हणजेच मजुरी १० हजार असेल तर त्यावर ५ टक्के जीएसटी घेतला जाईल म्हणजेच ५०० रुपये. त्यामुळे १ लाख रुपये सोन्याच्या दागिन्याची एकूण किंमत ही ऋडढ आणि घडणावळ पकडून १ लाख १३ हजार ५०० रुपये होईल. सोने आणि चांदीच्या बदलत्या दरांचा परिणाम सराफ बाजारातील विक्रेत्यांवरही झाला आहे. मोठ्या शोरूम्सपासून लहान दुकानदारांपर्यंत सर्वांनीच मान्य केले आहे की, दुकानातील ग्राहकांची ये-जा ३० ते ४० टक्क्यांनी कमी झाली आहे. ग्राहक टिकवून ठेवण्यासाठी अनेक विक्रेत्यांना ‘घडणावळ’ किंवा मेकिंग चार्जेसवर मोठी सूट द्यावी लागत आहे, त्यामुळे त्यांच्या नफ्यावर परिणाम होत आहे. चांदीचे दर ४ लाखांच्या आसपास गेल्याने, पायपट्ट्या किंवा चांदीची भांडी घेणारा मध्यमवर्गीय ग्राहक पूर्णपणे कमी झाला आहे.

सध्याच्या काळात ‘लग्न’ हा केवळ दोन जीवांचा किंवा कुटुंबांचा संगम राहिला नसून, तो एक अतिखर्चिक इव्हेंट बनला आहे. मध्यमवर्गीय आणि शेतकरी कुटुंबांसाठी तर लग्नाचा खर्च पेलणे म्हणजे आयुष्यभराची कमाई एका दिवसात खर्च करण्यासारखे झाले आहे. अलीकडच्या काळात लग्नाचे स्वरूप इतके भव्य झाले आहे की, सामान्य माणसासाठी ते एक मोठे आर्थिक संकट बनत चालले आहे. हल्ली प्री-वेडिंग शूट, हळदीचा इव्हेंट, संगीत सोहळा आणि एन्ट्रीसाठी होणारी रोषणाई यावर वारेमाप खर्च केला जातो. लोक काय म्हणतील? आणि त्यांच्या मुलाच्या लग्नापेक्षा आपल्या मुलीचं लग्न जास्त थाटात झालं पाहिजे, ही चढाओढ सामान्य माणसाला कर्जबाजारी करत आहे. अशा परिस्थितीत दागिन्यांचा खर्चही वाढल्याने सामान्य कुटुंबातील लग्नसोहळ्यांचा खर्च १२ ते १५ लाखांवर पोहोचला आहे. याठिकाणी आपण सोने आणि चांदीच्या दरात इतकी झपाट्याने वाढ का होत आहे ? हे देखील समजून घेतले पाहिजे. सोन्याच्या दराने अचानक गाठलेला उच्चांक ही केवळ स्थानिक बाब नसून, त्याचे धागेदोरे जागतिक राजकारण आणि अर्थकारणाशी जोडलेले आहेत. जागतिक स्तरावर जेव्हा युद्धाची परिस्थिती किंवा राजकीय अस्थिरता निर्माण होते, तेव्हा गुंतवणूकदार शेअर बाजार किंवा चलनाऐवजी ‘सोने’ हा सर्वात सुरक्षित पर्याय निवडतात. सध्या अमेरिका, इराण आणि इस्रायल यांच्यातील वाढत्या तणावामुळे जागतिक बाजारात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. युद्धाच्या भीतीने जगभरातील मोठ्या बँकांनी आणि गुंतवणूकदारांनी सोन्याची मोठ्या प्रमाणावर साठवणूक सुरू केली आहे. त्यामुळे मागणी वाढली आणि पर्यायाने भावही वाढले आहेत.

जगातील विविध देशांच्या मध्यवर्ती बँका (उदा. चीन, भारत, रशिया) आपल्या गंगाजळीत सोन्याचा साठा वाढवत आहेत. डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी अनेक देश सोन्याची खरेदी करत आहेत. जेव्हा ‘रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया’ किंवा ‘पीपल्स बँक ऑफ चीन’ सारख्या संस्था टनांनी सोने खरेदी करतात, तेव्हा जागतिक बाजारात पुरवठा कमी होतो आणि परिणामी भाव गगनाला भिडतात आणि याचा फटका सामान्य नागरिकांना बसतो. त्यामुळे सध्याच्या घडीला सोने चांदीचे वाढते भाव आणि मुलांची लग्नकार्ये हा अनेक कुटुंबांसाठी चिंतेचा विषय बनला आहे.

# हरित क्रांतीनंतर कृषी क्षेत्राची सर्वात मोठ्या प्रगतीच्या दिशेनं वाटचाल



डीएनए आणि आरएनए सारख्या न्यूक्लिक ॲसिड आणि प्रथिनांचा एक भाग म्हणून जीवनासाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला नायट्रोजन, हा शेतकऱ्यासाठी खत म्हणून नेहमीच एक विशेष महत्त्वाचा राहिला आहे. नायट्रोजनशिवाय पिकं चांगली वाढत नाहीत. पानं पिवळी पडतात, उत्पादन घटतं आणि उत्पन्नावर परिणाम होतो. म्हणूनच, भारतातील हरित क्रांतीनंतर, जगभरातील आधुनिक शेती युरियासारख्या नायट्रोजन खतांवर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. पण गंमत अशी आहे की, आपल्या सभोवताली सर्वत्र नायट्रोजन आहे हे आपल्याला माहीत आहे. आपण श्वास घेत असलेल्या हवेपैकी जवळपास ७८ टक्के भाग नायट्रोजन आहे. तरीही, बहुतेक पिकं त्याचा वापर करू शकत नाहीत. ही पिकं कारखान्यांमध्ये तयार केलेल्या खतांवर अवलंबून असतात, ज्यांच्या निर्मितीसाठी प्रचंड ऊर्जा आणि पैसा खर्च होतो. आता, विज्ञान निसर्गाकडून शिकून आणि बहुविद्याशाखीय दृष्टिकोन स्वीकारून एक आमूलाग्र नवीन शक्यतेचा शोध लावत आहे. काय होईल जर पिकं थेट हवेतून नायट्रोजन घेऊन स्वतःचं पोषण करू शकली तर? ही कल्पना, जी एकेकाळी अशक्य मानली जात होती, ती आता प्रत्यक्षात उतरत आहे. जगभरातील शास्त्रज्ञ अशी पिकं विकसित करत आहेत, जी त्यांच्या नायट्रोजनची गरज स्वतःच पूर्ण करू शकतील, जसं निसर्गातील काही वनस्पती आताही तेच करत आहेत. अनेक तज्ज्ञांचा असा विश्वास आहे की हरित क्रांतीनंतर शेतीमधील हा सर्वात मोठा बदल असू शकतो.

**नायट्रोजन इतका महत्त्वाचा का आहे?**

वनस्पतींच्या वाढीसाठी नायट्रोजन आवश्यक आहे. हा न्यूक्लिक ॲसिड, प्रथिनं, क्लोरोफिल आणि एन्झाइम्सचा एक महत्त्वाचा भाग आहे. पुरेसा नायट्रोजन नसल्यास, पिकं चांगलं उत्पादन देऊ शकत नाहीत. ही समस्या सोडवण्यासाठी, आधुनिक शेतीनं रासायनिक खतांचा वापर सुरू केला. गेल्या ६०-७० वर्षांत, खतांमुळं अन्न उत्पादन वाढण्यास आणि उपासमार रोखण्यास मदत झाली आहे. पण या यशाची एक किंमत मोजावी लागली आहे.

नायट्रोजन खतांच्या अतिवापरामुळं नद्या आणि भूजलाचं प्रदूषण, जमिनीच्या आरोग्याला हानी, शेतकऱ्यांसाठी उत्पादन खर्चात वाढ आणि हवामान बदलाला कारणीभूत असलेल्या हरितगृह वायूंचं उत्सर्जन यांसारखे परिणाम झाले आहेत. जागतिक स्तरावर, शेती दरवर्षी जवळपास २०० दशलक्ष टन नायट्रोजन खतांचा वापर करते. या खताच्या उत्पादनासाठी मोठ्या प्रमाणात जीवाश्म इंधनाचा वापर होतो आणि मोठ्या प्रमाणात कार्बन डायऑक्साइड वायू बाहेर पडतो. यामुळे शास्त्रज्ञांना एक मूलभूत प्रश्न विचारण्यास भाग पाडले आहे, उत्पादन कमी न करता शेती रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करू शकते का?

**निसर्गाला आधीच उत्तर माहित आहे**

विशेष म्हणजे, निसर्गानं ही समस्या बऱ्याच काळापूर्वीच अंशतः सोडवली आहे. भुईमूग, हरभरा, मसूर, सोयाबीन आणि कडधान्ये यांसारख्या काही शेंगांच्या पिकांना बाहेरील नायट्रोजन खताची फारशी गरज नसते. ती नायट्रोजनची कमतरता असलेल्या जमिनीतही चांगली वाढू शकतात. निसर्गाचं हे रहस्य जमिनीखाली दडलेलं आहे. या शेंगांच्या वनस्पतींच्या मुळांवर विविध आकाराच्या लहान गाठी तयार होतात, ज्यांना 'मूळ गाठी' म्हणतात. या गाठींच्या आत नायट्रोजनचं स्थिरीकरण करणारे मैत्रीपूर्ण जीवाणू राहतात. हे जीवाणू हवेतील नायट्रोजन घेऊन त्याचं अमोनियासारख्या अशा रुपात रुपांतर करतात, जे वनस्पती वापरू शकते. त्या बदल्यात, वनस्पती जीवाणूंना अन्न पुरवते. 'सहजीवन' म्हणून ओळखली जाणारी ही नैसर्गिक भागीदारी शंभर वर्षांहून अधिक काळापासून ज्ञात आहे. तेव्हापासून एक प्रश्न कायम आहे, जर शेंगांची पिकं हे करू शकतात, तर भात, गहू आणि मका यांसारखी प्रमुख पिकं तेच का करू शकत नाहीत?

**उत्तर मिळायला १०० वर्षे लागली**

अनेक दशकांपासून, शास्त्रज्ञांनी जीवाणू आणि शेंगा यांच्यातील सहजीवी भागीदारीद्वारे नायट्रोजन स्थिरीकरण करण्याची क्षमता गैर-शेंगा पिकांमध्ये हस्तांतरित करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांना अपयश आलं. ही प्रक्रिया खूप गुंतागुंतीची वाटत होती. वनस्पती आणि जीवाणूंमधील संवाद 'अत्यंत विशेषीकृत' असल्याचं दिसत होतं. वनस्पती जीवशास्त्र, अनुवंशशास्त्र आणि संगणकीय क्षेत्रातील प्रगतीमुळे अलीकडच्या काही वर्षांतच यातही यश मिळालं. संशोधकांना एक आश्चर्यकारक गोष्ट आढळली. शेंगांमध्ये दिसणाऱ्या मूळ गाठी या पूर्णपणे नवीन रचना नाहीत. त्या सर्व वनस्पतींमध्ये तयार होणाऱ्या सामान्य बाजूच्या मुळांशी जवळून संबंधित आहेत. सोप्या भाषेत सांगायचं तर, वनस्पतींमध्ये आधीच आवश्यक असलेली बहुतेक यंत्रणा असते. त्या फक्त तिचा वापर नायट्रोजन स्थिरीकरणासाठी करत नाहीत. ही गोष्ट समजल्यावर सर्व काही बदललं. याचा अर्थ असा होता की भात आणि गहू यांसारख्या पिकांमध्ये पायाभूत गोष्टींची कमतरता नव्हती. त्यांच्याकडे फक्त तशा प्रकारे कार्य करण्यासाठी सूचनांची कमतरता होती.

वनस्पतींच्या उत्क्रांतीवरील पुढील संशोधनातून आणखी एक महत्त्वाचा धागा मिळाला. शास्त्रज्ञांनी नायट्रोजन-स्थिरीकरण करणाऱ्या गाठी तयार करणाऱ्या वनस्पतींची तुलना जवळच्या संबंधित वनस्पतींशी केली, ज्यांमध्ये अशा गाठी तयार होत नाहीत. त्यांना जे आढळलं ते आश्चर्यकारक होतं. अनेक गाठी तयार न करणाऱ्या वनस्पतींनी कालांतरानं महत्त्वाची जनुकं गमावली आहेत असं दिसतं, असं नाही की ती त्यांच्यात कधीच नव्हती. यातून हे सूचित होतं की नायट्रोजन-स्थिरीकरण भागीदारी करण्याची क्षमता वनस्पतींच्या उत्क्रांतीमध्ये एकदाच प्रकट झाली असावी आणि नंतर अनेक प्रजातींमध्ये ती नष्ट झाली असावी. दुसऱ्या शब्दांत, निसर्गानं आधीच कठीण काम केलं होतं. विज्ञानाला फक्त वनस्पतींना एक जुनं कौशल्य पुन्हा शिकण्यास मदत करण्याची गरज होती.

**डच शास्त्रज्ञांनी दाखवला मार्ग**

कृषी विज्ञानासाठी जागतिक स्तरावर ओळखलं जाणारं, वॅगेनिंगेन विद्यापीठ आणि संशोधन केंद्रातील डच शास्त्रज्ञ ज्याला ते "स्वयं-खत देणारी पिके" म्हणतात, त्यावर काम करत आहेत. त्यांची कार्यपद्धती संकल्पनेच्या दृष्टीने सोपी आहे, परंतु अंमलबजावणीच्या दृष्टीनं गुंतागुंतीची आहे. पिकांच्या मुळांना नायट्रोजन-स्थिरीकरण करणारे जीवाणू आकर्षित करण्यास आणि त्यांना आश्रय देण्यास मदत करणे, वनस्पती आणि सूक्ष्मजीव यांच्यात एक स्थिर भागीदारी सक्षम करणे आणि पिकांना खताऐवजी हवेतील नायट्रोजन वापरण्याची परवानगी देणे, यावर काम करायला हवे. हे काम आता केवळ प्रयोगशाळांपुरतं मर्यादित राहिलेलं नाही. शेतातील चाचण्या आधीच सुरू झाल्या आहेत. या आंतरविद्याशाखीय संशोधनामध्ये वनस्पती विज्ञान, सूक्ष्मजीवशास्त्र, अनुवंशशास्त्र, डेटा विज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचाही समावेश आहे. आधुनिक शेती विविध क्षेत्रांतील सांघिक कार्यावर कशी अवलंबून आहे, याचं हे एक उत्तम उदाहरण आहे.

**परिणाम काय दर्शवतात?**

सुरुवातीच्या शेतातील चाचण्यांमधून उत्साहवर्धक परिणाम मिळाले आहेत. गहू आणि तांदूळ यांसारख्या सुधारित पिकांचं उत्पादन पारंपरिक पद्धतीनं खत दिलेल्या पिकांच्या तुलनेत समान असल्याचं दिसून आलं आहे. काही प्रकरणांमध्ये, या पिकांखालील जमिनीत नायट्रोजनची पातळी कमी होण्याऐवजी सुधारलेली दिसली. सोप्या भाषेत सांगायचं तर, ही पिकं केवळ जमिनीतून घेत नाहीत, तर ती जमिनीला काहीतरी परतही देतात. शेतकरी उत्पादनात घट न करता खतांचा वापर मोठ्या प्रमाणात कमी करू शकतात. यामुळेच या तंत्रज्ञानाबद्दलची उत्सुकता इतक्या वेगाने वाढत आहे.

**जागतिक शेती बदलू शकते**

नायट्रोजन खत हा शेतीमधील सर्वात मोठ्या खर्चांपैकी एक आहे. अनेक शेतकऱ्यांसाठी, हा एकूण उत्पादन खर्चाच्या २५ ते ३० टक्के असतो. जर पिकं स्वतःचा नायट्रोजन स्वतःच मिळवू शकली, तर शेती स्वस्त होईल, पर्यावरणाची हानी कमी होईल, आयात केलेल्या खतांवरील अवलंबित्व कमी होईल आणि अन्न उत्पादन अधिक लवचिक होईल. विकसनशील देशांना याचा सर्वाधिक फायदा होईल. अनेक लहान शेतकऱ्यांना पुरेसं खत परवडत नाही. स्वतःच खत तयार करणारी पिकं त्यांना कर्ज न वाढवता उत्पादन वाढविण्यात मदत करू शकतात. काही अभ्यासकांचं म्हणणं आहे की, या नावीन्यपूर्ण शोधाचं शाश्वततेसाठी तेच महत्त्व असेल, जे हरित क्रांतीचं अन्न उत्पादनासाठी होतं.

**भारतासाठी याचा अर्थ काय?**

भारत हा जगातील युरियाचा सर्वात मोठा वापरकर्ता आहे. सरकार दरवर्षी खतांवरील अनुदानावर प्रचंड रक्कम खर्च करते. त्याचवेळी, अनेक प्रदेशांमध्ये भूजलातील नायट्रेट प्रदूषण ही एक गंभीर आरोग्य समस्या बनत आहे. भारतीय शेतीसाठी, स्वतःचं पोषण करणारी पिकं परिवर्तनकारी ठरू शकतात. तांदूळ आणि गहू हे भारताच्या अन्न प्रणालीचा कणा आहेत. जर त्यांच्या नायट्रोजनच्या गरजेचा काही भाग जरी हवेतून मिळू शकला, तर खतांवरील अनुदान कमी होऊ शकतं, शेतकऱ्यांचा खर्च कमी होऊ शकतो, जमिनीचं आरोग्य सुधारू शकतं आणि पर्यावरणाची हानी थांबवता येऊ शकते. यामुळे शाश्वत शेती आणि दीर्घकालीन अन्न सुरक्षेला थेट पाठिंबा मिळेल.

**निसर्गाशी संघर्ष करण्यापासून ते त्याच्यासोबत काम करण्यापर्यंत**

गेल्या कित्येक दशकांपासून, शेतीनं निसर्गावर मात करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी अधिक खतं, अधिक रसायनं, अधिक पाणी याचा वापर केला. याचा परिणाम म्हणून उत्पादन वाढलं, परंतु खर्चही वाढला आणि पर्यावरणावर ताण आला. नवीन दृष्टिकोन वेगळा आहे. तो निसर्गाच्या विरोधात नव्हे, तर त्याच्यासोबत काम करण्याबद्दल आहे. स्वतःचं पोषण करणारी पिकं ही विचारसरणीतील बदलाचं प्रतीक आहेत. आधुनिक समस्या सोडवण्यासाठी, आधुनिक विज्ञानाच्या मार्गदर्शनाखाली, ती नैसर्गिक प्रक्रियांचा वापर करतात. हे तंत्रज्ञान अजूनही विकसित होत आहे. शेतकऱ्यांना ते त्यांच्या शेतात मोठ्या प्रमाणावर दिसायला आणखी काही वर्षे लागू शकतात. पण दिशा तरी स्पष्ट आहे.

**एक नवीन कृषी क्रांती?**

हरित क्रांतीनं लाखो लोकांना उपासमारीपासून वाचवलं. तिनं जग बदललं. पण तिनं नवीन आव्हानंही निर्माण केली. आज, शेती पुन्हा एका महत्त्वाच्या टप्प्यावर उभी आहे. हवेतून नायट्रोजन घेणारी, प्रदूषण कमी करणारी, खर्च कमी करणारी आणि जमिनीचं संरक्षण करणारी पिकं शेतीच्या पुढील युगाची व्याख्या करू शकतात. यावेळी, ध्येय केवळ अधिक अन्न मिळवणं हे नाही, तर उत्तम शेती, निरोगी जमीन आणि सुरक्षित भविष्य हे आहे. जर हे वचन पूर्ण झालं, तर भविष्यातील पिढ्या मागे वळून म्हणतील, याच काळात शेतीनं पृथ्वीला हानी न पोहोचवता स्वतःचं पोषण करायला शिकवलं.

## निरोगी आयुष्याची साधीसोपी गुरुकिल्ली कोणती?; डॉ. जगन्नाथ दीक्षित यांनी सांगितला गुरुमंत्र

निरोगी आयुष्याची आस प्रत्येकाला असते. त्यासाठी विविध प्रकारचे आहार आणि वेगवेगळ्या व्यायाम प्रकारांचे सोशल मीडियावर (सोशल मीडिया) पेव फुटले आहे. दररोज नवीन ट्रेंडनुसार आहार आणि व्यायाम बदलत आहेत. या पार्श्वभूमीवर निरोगी आयुष्याची गुरूकिल्ली 'दीक्षित पॅटर्न'चे प्रणेते आरोग्यतज्ज्ञ डॉ. जगन्नाथ दीक्षित यांनी मांडली आहे.



याचवेळी समाज माध्यमांवर आरोग्याबाबत चुकीच्या माहितीचा भडिमार होत असून, कोणती माहिती शास्त्रीयदृष्ट्या योग्य आहे आणि कोणती दिशाभूल करणारी आहे, हे तपासणे अत्यंत गरजेचे आहे, याकडेही त्यांनी लक्ष वेधले.

आरोग्यविषयक जनजागृतीसाठी सुचेता स्वास्थम यांच्या वतीने विकसित केलेल्या 'स्वास्थम' या मोबाईल उपयोजनाचे (ॲप) नुकतेच अनावरण झाले. ज्येष्ठ आरोग्यतज्ज्ञ डॉ. जगन्नाथ दीक्षित, एनईएफ कनेक्टचे संस्थापक गणेश नटराजन आणि बायोरॅड मेडिसिसचे व्यवस्थापकीय संचालक जितेंद्र हेगडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

यावेळी डॉ. दीक्षित म्हणाले की, नियमित व्यायाम आणि सकारात्मक जीवनशैली हीच निरोगी आयुष्याची गुरुकिल्ली आहे. परंतु सध्या समाज माध्यमांमुळे माहितीचा प्रचंड भडिमार होत आहे. प्रत्येकजण स्वतःला तज्ज्ञ समजू लागला आहे. कोणती माहिती शास्त्रीयदृष्ट्या योग्य आहे आणि कोणती दिशाभूल करणारी आहे, हे तपासणे अत्यंत गरजेचे आहे. आजार बरा करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध आहे, परंतु माणूस आजारीच पडू नये यासाठी मार्गदर्शन करणाऱ्या 'स्वास्थम'सारख्या उपक्रमांची समाजाला गरज आहे.

सुदृढ आरोग्य म्हणजे केवळ शारीरिक तंदुरुस्ती नव्हे, तर मानसिक आरोग्यही तितकेच महत्त्वाचे आहे. सकारात्मक विचारसरणी शरीरावर आणि एकूण जीवनमानावर खोल परिणाम घडवते, असे जितेंद्र हेगडे म्हणाले. जीवन जगण्यासाठी शिक्षण आवश्यक आहे, तसेच निरोगी राहण्यासाठी आरोग्यशिक्षणही तितकेच महत्त्वाचे आहे. समाजाला योग्य आरोग्यदिशा दाखवणारे 'स्वास्थम'सारखे उपक्रम काळाची गरज आहेत, असे नटराजन यांनी नमूद केले.

ॲपच्या अनावरणानंतर आयोजित आरोग्यविषयक चर्चासत्रात डॉ. राजेश धोपेश्वरकर, डॉ. अतुल राक्षे, मेजर विशाल कराड, डॉ. विनिता केतकर, डॉ. किरण खरात आणि डॉ. पुष्कर खैर यांनी आपले विचार मांडले. यावेळी उद्योगपती सुनील देशमुख आणि सुचेता स्वास्थमचे मार्गदर्शक व सल्लागार विनोद शास्त्री यांचा सत्कार करण्यात आला. तसेच 'स्वास्थम' उपयोजनाच्या प्रारंभिक चाचणी टप्प्यात योगदान दिल्याबद्दल परिचारिका रूपाली कसबे, नेहल जावळे, नीलम शेख, नंदिनी शेट्ये, संजय कुर्हाडे आणि कांचन देशकर यांचाही सन्मान करण्यात आला.

**आरोग्याबाबत सजग बनविणार**

स्वास्थमचे संस्थापक सुचेता गोडबोले देशपांडे आणि राहुल देशपांडे यांनी 'स्वास्थम' उपयोजनाची संकल्पना उलगडून दाखविली. देशातील विविध सामाजिक-आर्थिक स्तरांतील शेकडो लोकांच्या आरोग्यविषयक अभ्यासातून ही संकल्पना विकसित करण्यात आली आहे. पुढील दहा वर्षांत कोट्यवधी लोकांपर्यंत पोहोचून त्यांना आरोग्याबाबत सजग बनवणे, हा आमचा दीर्घकालीन उद्देश आहे, असे त्यांनी नमूद केले.

## गॅस, अपचन, तोंडाची दुर्गंधी : काळी वेलची करते 'हे' सगळे त्रास दूर

वेलचीला मसाल्यांची राणी म्हंटले जाते. तिचा दरवळ आणि चव कोणत्याही पदार्थाला खास बनवते. पण अनेकांना माहीत नसलेली गोष्ट म्हणजे, वेलची केवळ स्वयंपाकापुरती मर्यादित नाही, तर ती आरोग्यासाठीही अत्यंत उपयुक्त आहे. विशेषतः काळी वेलची (मोठी वेलची) आयुर्वेदात शतकानुशतके औषधी घटक म्हणून वापरली जाते.



काळ्या वेलचीमध्ये असे अनेक गुणधर्म आहेत, जे शरीराला आतून मजबूत करतात आणि अनेक आजारांपासून संरक्षण देतात. योग्य प्रमाणात आणि योग्य पद्धतीने वापरल्यास काळी वेलची रोजच्या आहारातून आरोग्याला मोठा फायदा देऊ शकते.

**ॲंटी-बॅक्टेरियल आणि ॲंटी-सेप्टिक गुणधर्म**

काळ्या वेलचीच्या बियांपासून काढलेल्या तेलामध्ये जंतुनाशक आणि बॅक्टेरियाविरोधी गुणधर्म आढळतात. त्यामुळे शरीरातील हानिकारक जीवाणू आणि बुरशी नष्ट होण्यास मदत होते. नियमित सेवनामुळे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत राहते आणि संसर्गाचा धोका कमी होतो.

गॅस, अपचन, तोंडाची दुर्गंधी... काळी वेलची करते 'हे' सगळे त्रास दूर; जाणून घ्या पचनापासून हृदयापर्यंतचे जबरदस्त फायदे

महागड्या सप्लिमेंट्सना रामराम! खिशाला परवडणाऱ्या शाकाहारी फूड कॉम्बिनेशन्समधून मिळवा भरपूर प्रोटीन

**लिव्हर निरोगी ठेवण्यासाठी फायदेशीर**

काळी वेलची शरीरातील विषारी घटक बाहेर टाकण्यास मदत करते. त्यामुळे लिव्हरवरील ताण कमी होतो आणि त्याचे कार्य सुधारते. फॅटी लिव्हर किंवा लिव्हर कमकुवत झालेल्या व्यक्तींना काळी वेलची उपयुक्त ठरू शकते.

**दात आणि तोंडाच्या आरोग्यासाठी उपयोगी**

काळी वेलची दात आणि हिरड्यांच्या आरोग्याची काळजी घेते. दातांच्या संसर्गापासून संरक्षण करते आणि तोंडातील दुर्गंधी कमी करते. तिचा तीव्र सुगंध तोंडात दीर्घकाळ ताजेपणा टिकवून ठेवतो.

**किडनी आणि मूत्रमार्गासाठी फायदेशीर**

काळी वेलची लघवीशी संबंधित समस्या कमी करण्यास मदत करते. बॅक्टेरियाची वाढ रोखून मूत्रमार्ग संसर्गाचा धोका कमी होतो. वारंवार यूटीआयचा त्रास होणाऱ्यांसाठी ती उपयोगी ठरू शकते.

**हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर**

काळी वेलची रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास मदत करते. यामुळे रक्ताच्या गुठळ्या, उष्माघात आणि स्ट्रोकचा धोका कमी होतो. मर्यादित प्रमाणात सेवन केल्यास हृदय दीर्घकाळ निरोगी राहण्यास मदत मिळते.

**पचनसंस्थेसाठी फायदेशीर**

गॅस, पोटफुगी, अपचन किंवा पोटदुखीचा त्रास असलेल्या लोकांसाठी काळी वेलची फायदेशीर ठरते. ती पचन सुधारते, भूक वाढवते आणि पोटातील अल्सरचा धोका कमी करण्यास मदत करते.

**शरीर डिटॉक्स करण्यास मदत**

गॅस, अपचन, तोंडाची दुर्गंधी... काळी वेलची करते 'हे' सगळे त्रास दूर; जाणून घ्या पचनापासून हृदयापर्यंतचे जबरदस्त फायदे

केस गळतात? महागड्या हेअर ट्रीटमेंट सोडा, 'शेपू' खा! ऋजुता दिवेकरने सांगितले भन्नाट फायदे

काळी वेलची शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्याची प्रक्रिया सुधारते. रक्तप्रवाह शुद्ध ठेवण्यास मदत होते, कॅफिनसारखे घातक घटक कमी होतात आणि शरीरातील ऊर्जा पातळी सुधारते.

**आहारात काळी वेलची कशी वापरावी?**

- भात, पुलाव किंवा बिर्याणी शिजवताना उकळत्या पाण्यात एक वेलची टाका
- सूप, भाज्या, स्ट्यूमध्ये वेलची पावडर वापरा
- टिक्का, कबाब किंवा मसालेदार पदार्थांमध्ये वापर करता येतो
- गोड पदार्थांमध्ये म्हणजे फिरणी, हलवा, रबडी, गुलाब जाममध्ये स्वाद वाढवते
- चहा, हर्बल टी, थंडाई किंवा हळदीच्या दुधात घालून सेवन करता येते
- मधासोबत घेतल्यास सर्दी-खोकल्यावर आराम मिळतो

**किती प्रमाणात घ्यावी?**

दररोज सुमारे ३ ग्रॅम काळी वेलची पुरेशी मानली जाते. मात्र, सेवनानंतर ॲलर्जी, पोटदुखी किंवा त्वचेची समस्या जाणवत असल्यास त्वरित वापर थांबवावा.

स्वयंपाकघरात सहज उपलब्ध असलेली काळी वेलची ही केवळ मसाला नाही, तर आरोग्यासाठीचा आयुर्वेदिक खजिना आहे. योग्य प्रमाणात आणि नियमित वापर केल्यास ती शरीराला आतून बळकट ठेवण्यास नक्कीच मदत करू शकते.